**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११८ शुक्रवार, दि. २० जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्ट्स्**

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

# 'ते' रंग बदलणारे सरडे : शिंदे

## एकनाथ शिंदे शिवसेना व उबाठा शिवसेना मेळाव्यात टोलेबाजी

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : सरडे रंग बदलतात, पण एवढ्या वेगाने रंग बदलणारे सरडे मी पाहिले नाहीत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी असं म्हणत उद्धव ठाकरे यांना जोरदार टोला लगावला आहे.**

शिवसेनेचा काल ५९ वा वर्धापन दिन आहे. या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा मेळावा वरळीतील एनएससीआय डोम येथे सुरू आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका करत आहेत.

देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना खालच्या पातळीवर आरोप केले होते. काय बदल झाला आणि काय जादू झाली ते आपण पाहतोय, असंही एकनाथ शिंदें म्हणाले. मी मुख्यमंत्री असताना मला रोज शिव्या दिल्या जात होत्या. माझ्यावर उठसूट आरोपही केले जात होते. मलाच नव्हे तर तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही खालच्या थरावर आरोप केले. देवेंद्र फडणवीस



यांना तुरुंगात टाकण्याचे प्रयत्न केले. तू राहील नाहीतर मी राहील अशी भाषा केली. अजून काय काय बोलले मी ते सांगू शकत नाही. पण आता पाहा काय बदल झाला? काय जादू झाली?, असा खोचक सवालही एकनाथ शिंदे यांनी केला. एकनाथ शिंदे काल ठाण्यात होते. यावेळी मीडियाशी संवाद साधताना बोलत होते. पुढे ते असेही म्हणाले, सरडे रंग बदलतात. पण एवढे फास्ट वेगाने रंग बदलणारे सरडे मी पाहिले नाहीत, असा घणाघात एकनाथ शिंदे यांनी केला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्याला त्यांचे विचार मानणारे येतील. त्यांचे विचार सोडणाऱ्यांचा संबंध नाही, असं विधान उद्धव ठाकरे यांनी केलं होतं. ठाकरेंच्या या विधानाचाही शिंदेंनी समाचार घेतला. अरे कार्यक्रम कुणाचा आहे? बाळासाहेबांचं स्मारक कोण बांधतोय? सरकार बांधतंय. बाळासाहेबांचं स्मारक हे कुणाच्या मालकीचं नाही. त्यामुळे त्यांना हे बोलण्याचा नैतिक अधिकार नाही, अशी जोरदार टीकाही त्यांनी केली.

# ... ही माझ्या पूर्वजांची पुण्याई आहे : उद्धव ठाकरे

मुंबईत शिवसेनेच्या ५६ व्या वर्धापन दिनानिमित्त उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि त्यांच्या नेत्यांवर जोरदार टीका केली. ठाकरे म्हणाले की, भाजपने पाळलेली बेडकं आज डराव डराव करतील. ही पाळीव बेडकं डोळ्यासमोर येतात. या चोरांना खरंच मी म्हणेल लाज, लज्जा, शरम ठेवली नाही. तसेच नॅपकिन आहे, तो तरी का ठेवला आहे.

कुणाच्याही नशिबात किंवा भाग्यात असं प्रेम लिहिलं असेल. ही माझी पुण्याई नाही. ही माझ्या पूर्वजांची पुण्याई आहे. तुमच्या सर्वांचं अतोनात प्रेम आहे. काही लोकांनी शिवाजी पार्कात मैदानात घ्यायची घाई करू नका, म्हणून सांगितलं. पण शिवसेनाप्रमुख म्हणाले, काय व्हायचं ते होईल, पण मी शिवाजी पार्कात सभा घेईन. शिवाजी पार्कात सभा घेतली. मी समोर माँ सोबत बसलो होतो. आज जे दाढी खाजवतात, ते कुठे होते माहीत नाही.

निवडणूक जिंकण्यासाठी माता-भगिनींशी केलेला वादा, जनतेशी केलेला वादा पाळत नाहीत. मग तो पक्ष माझ्याशी केलेला वादा कसा पाळेल? अडीच-अडीच वर्षांचा मुख्यमंत्रीपदाचा वादा नव्हता म्हणतात. मग माता-भगिनीला केलेला वादा खरा होता की नव्हता? केंद्रात सरकार आल्यापासून पनवती लागली आहे. मंदिराचं छत गळतंय, विमान अपघात झाला, रेल्वे अपघात झाला, कोणी जबाबदारी घेत नाही. मेट्रोत पाणी भरलं. आज देशाला पंतप्रधानाची गरज आहे, भाजपला पंतप्रधान आहे. देशाला नाही.

## संमिश्र

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**ठाणे** : समृद्धी महामार्गावर वाशिंद आणि आमणे दरम्यान काल पहाटेच्या सुमारास क्रुझर जीप आणि ट्रक यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, परभणी जिल्ह्यातील एक कुटुंब चारचाकीने घेऊन कुटुंबासह भिवंडी येथील नातेवाईकांकडे येत होते. दरम्यान, समृद्धी महामार्गावरील चॅनल क्र. ६९० जवळ पावसामुळे रस्ता ओला होता आणि चालकाला झोप येत होती. यामुळे समोर जात असलेल्या ट्रकला भरधाव वेगात धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य सात प्रवासी गंभीर जखमी झाले.

### मा. मंत्री शिंगणेंच्या बंगल्यात स्फोट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बुलढाणा** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी मंत्री राजेंद्र शिंगणे यांच्या येथील निवासस्थानी काल रात्री अचानक स्फोट झाला. त्यानंतर लागलेल्या आगीत शिंगणे यांच्या घरातील स्वयंपाक घरासह त्यातील वस्तू भस्मसात झाल्या आहेत. या घटनेमुळे बुलढाण्यात एकच खळबळ माजली होती. दरम्यान, हा स्फोट फ्रिजच्या कॉम्प्रेसरमुळे झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### विद्यार्थिनीची घेतली कॉलेजवरून उडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : एका २१ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने कॉलेजच्या इमारतीवरून उडी मारून स्वतःची जीवनायात्रा संपवल्याची दुःखद घटना मुंबईत घडली घडली आहे.




# शेतमाल प्रक्रिया उद्योगास पाच कोटींची मदत : मंत्री कोकाटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक** : सिक्कीममध्ये संपूर्ण सेंद्रिय शेती केली जाते. महाराष्ट्रात मात्र बहुतांश शेतकरी यापासून अद्यापही दूर आहेत. आगामी काळात राज्यात सेंद्रिय शेती विकासासाठी शासनाच्या मदतीने कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.

'एआय'वर आधारित प्रणालीमुळे शेतीमाल विक्री यंत्रणा बदलेल. भाव चांगला मिळून शेतकऱ्यांची प्रगती होईल. या आधुनिक शेतीकडे तरुणांना वळविण्याचे तसेच शेतमाल प्रक्रिया उद्योगाला ५ कोटी रुपये मदत देण्याचे सरकारचे धोरण असल्याचे कृषिमंत्री माणिकराव



कोकाटे यांनी सांगितले.

राज्यात सेंद्रिय शेतीच्या विकासासाठी तसेच जनतेच्या आरोग्यासाठी सेंद्रिय शेतीच्या प्रचार व प्रसारासाठी विद्यापीठांच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीबाबत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. तसेच शेतीला चालना देण्यासाठी शासनाच्या वतीने प्राधान्य देण्यात येत आहे. सेंद्रिय शेती आणि निगडित व्यवसायांना प्रथम परवानगी देण्यात येत आहे. मात्र, पान ४

# जि. प. गट अन् गण समिती गठित

## प्रभाग रचनेसाठी जिल्हा व तालुकास्तरावर समिती स्थापन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांच्या प्रभाग रचनेसाठी जिल्हा व तालुकास्तरावर समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. यात जिल्हा व तालुका समितीच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी राहणार आहेत. समिती स्थापन झाल्याने आता प्रशासकीय पातळीवर प्रभाग रचनेचे काम सुरू झाले आहे.

दरम्यान प्रभाग रचनेचे काम सुरू होणार असल्याने आता राजकीय पक्षाकडून देखील निवडणूक हालचालींना वेग आला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची तयारी आता सुरू झाली आहे. ग्रामविकास खात्याने अहिल्यानगर जिल्ह्यात



जिल्हा परिषदेचे ७५ गट तर पंचायत समितीचे १५० गण राहणार असल्याचे स्पष्ट करून प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत.

त्यानुसार १४ जुलैला जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना जाहीर केली जाईल. १८ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे द्यावा, असे आदेश ग्रामविकास विभागाचे मुख्य सचिव एकनाथ डवले दिले होते. त्यानुसार आता जिल्हा परिषद व पंचायत समितीची प्रभाग रचना तयार करण्यासाठी जिल्हा व तालुका पान ४

### गावानिहाय कार्यकर्ते, बुथ समितीच्या तयारी

प्रभाग रचना पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी ही जिल्हाधिकारी यांच्यावर राहणार आहे. त्यानुसार आता प्रभाग रचनेच्या कामाला सुरवात झाली आहे. प्रभाग रचनेच्या कामाला सुरवात झाल्याने राजकीय पक्षांनी देखील निवडणूक हालचालींना सुरवात केली असून गावानिहाय कार्यकर्ते व बुथ समितीच्या तयारी केली जात आहे.

# निमगाव खैरीत दोघांवर प्राणघातक हल्ला

## एक गजाआड; अन्य आरोपी फरार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील निमगाव खैरी येथे एका चप्पल दुकानदारास व त्याच्या वडिलांना जातीवाचक शिविगाळ करत लाकडी दांडक्याने आणि टोकदार हत्याराने मारहाण करण्यात आली.



याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून शुभम हुसले याला अटक करण्यात आली आहे.

दिपक बाळासाहेब तुपे (रा. निमगाव खैरी) यांनी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी निलेश बाळासाहेब परदेशी, विलास शिवाजी वाघ, धनंजय रोहम (पूर्ण नाव अज्ञात), अमोल दुशिंग (पूर्ण नाव अज्ञात), सौरभ उर्फ अभिजीत राजपूत (पूर्ण नाव अज्ञात), तुषार वाघ (पूर्ण नाव अज्ञात) आणि शुभम हुसले यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार फिर्यादी दिपक तुपे यांचे वडील बाळासाहेब तुपे व त्यांचा भाचा शिवाजी देशमुख हे दुपारी साडेतीन वाजता 'हॉटेल गीतगंगा' येथे बसलेले असताना वरील आरोपींनी त्यांच्याकडे पाहून 'तुम्ही खालच्या जातीचे आहात, आमच्यासमोर बसण्याची तुमची पान ४

# 'डॉ. तनपुरे'च्या चेअरमनपदी तनपुरे

## 'जनसेवा'चा जल्लोष; व्हा. चेअरमनची निवड लांबणीवर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या डॉ. तनपूरे सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी काल बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडी नंतर जनसेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करुन आनंदोत्सव साजरा केला.

राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील डॉ. तनपूरे साखर कारखान्याची निवडणूक प्रक्रिया नुकतीच पार पडली. या निवडणूकीत तिरंगी लढत होऊन बाजार समितीचे सभापती अरुण तनपूरे यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळाने २१ पैकी २१ जागेवर दणदणीत विजय मिळवला होता.

सभापती अरुण तनपूरे हेच बंद पडलेला डॉ. तनपूरे साखर कारखाना चालू करु शकतात. अशी खुणगाठ मनाशी बांधून कारखान्याच्या सभासदांनी अरुण तनपूरे यांच्या जनसेवा मंडळावर विश्वास ठेऊन त्यांच्या ताब्यात कारखान्याची एकहाती सत्ता दिली. कारखान्यात जनसेवा मंडळाची एकहाती सत्ता आल्यानंतर चेअरमन पान ४

### सभापती अरुण तनपुरे कारखाना चालू करतील

अरुण तनपूरे यांनी राहुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदावर राहून बाजार समितीला राज्यात नावलौकिक मिळविले. त्याचप्रमाणे ते बंद पडलेला डॉ. तनपूरे कारखाना चालू करुन सुस्थितीत आणतील असा विश्वास यावेळी सभासदांनी व्यक्त केला.

# ड्रीमलायनरचा ब्लॅक बॉक्स अमेरिकेला पाठवला जाणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहमदाबाद** : १२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानाचा ब्लॅक बॉक्स तपासासाठी अमेरिकेला पाठवला जाऊ शकतो. अपघातग्रस्त बोईंग ७८७-८ ड्रीम लायनर विमानाचा ब्लॅक बॉक्स अपघाताच्या दिवशी सापडला. त्यामुळे तो तपासासाठी अमेरिकेला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय केंद्र सरकारने घ्यायचा आहे. ब्लॅक बॉक्सचे दोन भाग कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डर उष्णता आणि आगीमुळे खराब झाले. देशात अशी कोणतीही प्रयोगशाळा नाही जिथे डेटा पुनर्प्राप्त करता येईल. या कारणास्तव, आता त्यांना अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाच्या प्रयोगशाळेत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुरक्षा आणि गोपनीयता राखण्यासाठी सरकारी अधिकारी देखील त्यांच्यासोबत असतील.

# सर्वगुणसंपन्न नागरीक घडविण्यासाठी संजीवनी कटिबध्द : सुमित कोल्हे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : संजीवनी सैनिकी स्कूलने मागील काही वर्षांपासून वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक कीर्तिमान स्थापित केले असुन सर्वगुण संपन्न नागरीक घडवून भविष्यात आपला विद्यार्थी देशाची, समाजाची आणि आपल्या कुटूंबाची कशा चांगल्या प्रकारे सेवा करू शकेल, या निती मुल्यांची शिकवण देण्यासाठी तसेच आपला विद्यार्थी स्वावलंबी बनलाच पाहिजे, हे सर्व ध्येय डोळ्या समोर ठेवून विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्वाच्या आणि आधुनिक अभ्यासक्रमाचे पैलु रूजविण्याचे कार्य संजीवनी सैनिकी स्कूलमध्ये केल्या जाते, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी केले.

संजीवनी सैनिकी स्कूल आयोजीत इयत्त सहावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या स्वागत कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी डी. एन. सांगळे, प्राचार्य कैलास दरेकर पान ४



स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी घालून दिलेली शैक्षणिक आचार संहिता आम्ही काटेकोर पाळत असून त्याचे उत्तम रिझल्ट आम्हाला मिळत आहे.आपल्या पाल्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी संस्थेने ६ वीपासून एनडीए, जेईई, एनईईटी अशा स्पर्धात्मक परीक्षांचे फाऊंडेशन कोर्सेस सुरू केले आहेत. तसेच आपले पाल्य सुरक्षित आहे.

**- सुमित कोल्हे, विश्वस्त**

# हार, बुके स्वरूपात शुभेच्छा स्वीकारणार नाही : कोल्हे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांचा वाढदिवस २१ जून रोजी साजरा होणार आहे. परंतु, नेहमीच्या हार-तुरे, बुके यांच्या पलीकडे जावून कोल्हे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून एक आगळी-वेगळी आणि समाजहिताची परंपरा सुरू केली आहे. शालेय साहित्याच्या रूपाने शुभेच्छा स्वीकारण्याचा आदर्श त्यांनी सर्वांसमोर नेहमी ठेवला आहे.



या उपक्रमांतर्गत वाढदिवसानिमित्ताने हजारो विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, दप्तर यांसारखे शालेय साहित्य मोफत देण्यात येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा मोठा लाभ होतो. शिक्षण हीच खरी गुंतवणूक आहे, हा संदेशच कोल्हे आपल्या कृतीतून समाजाला देत असतात.

याशिवाय, वाढदिवसाच्या निमित्ताने पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता मोहिमा, रक्तदान शिबिरे अशा विधायक उपक्रमांचे आयोजन संजीवनी संस्थांमार्फत पान ४

# आपण एक निसर्ग पूजक गमावला

## जलसंपदा मंत्री विखेंनी वाहिली पद्मश्री चितमपल्लींना श्रध्दांजली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या निधनाने एक निसर्ग पूजक आपण गमावला असून, आपल्या व्यासंगाला लेखनाची जोड देवून साहित्याच्या माध्यमातून निसर्ग लोकांपर्यंत पोहचविणारा सिध्दहस्त लेखक काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त करुन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी श्रध्दांजली वाहिली आहे.

शोक संदेशात मंत्री विखे पाटील यांनी म्हटले आहे की, मारुती चितमपल्ली यांनी आयुष्यभर वन, वन्यजीव व्यवस्थापन, वन्य प्राणी आणि पक्षीजगता विषयी संशोधन करण्यात प्रत्येक क्षण वेचला.



शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही स्वस्थ न बसता निसर्ग संपन्नतेचा अभ्यास करण्यात मोठे योगदान दिल्यामुळेच त्यांनी शब्दबध्द केलेल्या निसर्गाचे वर्णन साहित्याच्या माध्यमातून वाचकां समोर आले.

पाच लाख किलो मीटरचा प्रवास आणि विविध १३ भाषांचे ज्ञान अवगत असलेल्या मारुती चितमपल्ली यांच्यातील लेखकाने साहित्य विश्वाला २५ हून अधिक पुस्तकांची भेट दिली. आपल्यातील व्यासंगाला लेखनाची जोड देवून निसर्ग लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेवटपर्यंत काम केले. यासर्व कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने पद्मश्री पुरस्कारने त्यांचा केलेला सन्मान राज्यासाठी अभिमानास्पद ठरला.

पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या निधनाने निसर्गप्रेमी साहित्यिक आपण गमावला असून, कधी न भरुन येणारी हानी झाली असल्याची भावना मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# अकोलेत एकाला साडेसहा लाखांना गंडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : वाहन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात नाशिकच्या एजंटने अकोले तालुक्यातील गणोरे येथील एकाची साडेसहा लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी भाऊसाहेब भागुजी आंबरे (रा. गणोरे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी असून आरोपी मोहंमद जाकीर इब्राहिम शेख (रा. दातार मोटर्स, पखाल रोड, नाशिक) हे जुने वाहन खरेदी-विक्रीचे एजंट आहेत.

फिर्यादी आंबरे यांचा विश्वास संपादन करून एमएच १५ जीव्ही ८१८७ या क्रमांकाची पिकअप गाडी ६ लाख ५५ हजार रुपयांत फिर्यादीला विक्री करून फिर्यादीकडून रोख रक्कम ४ लाख ७० रुपये घेऊन करारनामा करून दिला. त्यानंतर ३० हजार रुपये फोन पेवर घेऊन गाडीवरील महेंद्र फायनान्सचे बाकीचे कर्ज रक्कम मी भरतो, असे म्हणून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर ती रक्कम आरोपीने न भरल्याने फिर्यादी आंबरे यांनी पान ४

# विनोदातून मानवी स्वभावातील गुणांचे दर्शन

## प्रा. हंबीरराव नाईक; अण्णासाहेब परजणे पुण्यस्मरण सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** अनुरुप वातावरणाची निर्मिती, संवादाचा चटकदारपणा व विडंबनाचे कौशल्य उलगडून दाखविणे ही विनोदाची खास वैशिष्ट्ये असतात. विनोदातून केवळ काही ठरावीक समाजाचे दर्शन घडत नाही तर मानवी जीवनातील व स्वभावातील चांगुलपणाबरोबरच विसंगतीचेही दर्शन घडते, असे उद्गार श्रीरामपूर येथील ज्येष्ठ विनोदी साहित्यिक व व्याख्याते प्रा. हंबीरराव नाईक यांनी संवत्सर येथील कार्यक्रमात काढले. आपल्या सहज विनोदी शैलीने प्रा. नाईक यांनी श्रोत्यांना मनमुराद हसविले.

प्रा. नाईक पुढे म्हणाले, स्वातंत्र्योत्तर काळात विनोद नवनवीन शैलीत आणि विविध रुपातून प्रकट होऊन त्याचा विकास झालेला आहे. काही चांगल्या दर्जाचे विनोद जीवनदर्शनाच्या प्रेरणेतून व मूल्यनिष्ठेतून निर्माण झालेले असून कोटीरुप विनोदाचे काही चांगले नवे आविष्कार रंजनाच्या प्रेरणेतून प्रकट झालेले आहेत. विनोद निर्मितीला अत्यंत आवश्यक असलेली तरल कल्पनाशक्तीची देणगी, सुक्ष्म निरीक्षणशक्ती व उत्तम भाषाप्रभुत्व व्याख्यात्यांकडे असायला हवे.

गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे पाटील (आण्णा) यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त संवत्सर येथे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानातून ''हसण्यासाठी जीवन आपुले..'' या विषयावर प्रा. नाईक बोलत होते. गोदावरी खोरे दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यासाठी नाशिक पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सह. आयुक्त डॉ. बी. आर. नरवाडे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, ज्येष्ठ कार्यकर्ते पद्माकांत कुदळे, ॲड. रवींद्र बोरावके, तालुका विकास मंडळाचे अध्यक्ष अंबादास देवकर, पंचायत समितीचे माजी सदस्य कृष्णराव परजणे, प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळाच्या सचिव सौ. मीरा काकडे, कोपरगांव तालुका लघू पशु चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अनिलराव तांबे, पशुधन विकास अधिकारी डॉ. दिलीपराव दहे, राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पंडीतराव वाघिरे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, पद्माकांत कुदळे, राजेश परजणे यांचीही भाषणे झालीत. संवत्सर महाविद्यालयाच्या गोदानाम संवत्सरे या नियतकालिकेचे प्रकाशन, संवत्सर येथील नामदेवराव परजणे पाटील महाविद्यालय तसेच कोपरगांव येथील नामदेवराव परजणे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती धनादेशाचे वाटप करण्यात आले.

# ‘साई आदर्श’च्या चेअरमनपदी संगीता कपाळे

## व्हा. चेअरमनपदी स्वराज गिते यांची निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरी फॅक्टरी येथील साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमनपदी संगीता शिवाजीराव कपाळे तर व्हाईस चेअरमनपदी स्वराज विष्णुपंत गिते यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.

साई आदर्श पतसंस्थेसाठी सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. संस्थेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी एम. ए. शेख यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन व व्हा. चेअरमन पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली. चेअरमन पदासाठी संगीता शिवाजीराव कपाळे यांच्या नावाची सूचना बाळासाहेब मुसमाडे यांनी मांडली तर रंगनाथ घाडगे यांनी अनुमोदन दिले. तर व्हा. चेअरमन पदासाठी स्वराज गीते यांच्या नावाची सूचना सुभाष विटनोर यांनी मांडली तर चांगदेव पवळे यांनी अनुमोदन दिले.

यावेळी अक्षय कपाळे, सुरेश शेजुळ, रंगनाथ घाडगे, बाळासाहेब मुसमाडे, पारस नहार, फैमीदा शेख, चांगदेव पवळे, चांगदेव साळवे, सुभाष विटनोर यांची संचालक पदी निवड करण्यात आली.

याप्रसंगी साई आदर्श मल्टीस्टेट व नगर जिल्हा स्थैर्यनिधी संघाचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, योगप्रशिक्षक किशोर थोरात, साई आदर्श मल्टीस्टेटचे व्यवस्थापक सचिन खडके, साई आदर्श पतसंस्थेचे व्यवस्थापक गोपीनाथ हारगुडे, रवींद्र झावरे आदिंसह पतसंस्थेचे व साई आदर्श मल्टीस्टेटचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पंचायत समिती कार्यालयात मोकळ्या खुर्च्या

## कर्मचारी हे कार्यालयापेक्षा चहाच्या टपरीवर जास्तवेळ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** मागील काही महिन्यापूर्वी नवीन पंचायत समितीचा भव्य लोकार्पण सोहळा करण्यात आला. पंचायत समितीचे कार्यालय पहिले प्रशासकीय इमारत मध्ये होते. तिथून ते शहरात पूर्वीच्या जागेवर आणण्यात आले.

राहाता शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने तालुक्यातून अनेक शेतकरी वर्ग व नागरिक आपली कामे घेऊन कार्यालयामधील विविध विभागातील कर्मचारी व अधिकारी यांच्याकडे येत असतात. मात्र शेतकरी व नागरिक पंचायत समितीच्या कार्यालयात आले असता त्या ठिकाणी कोणीही अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसल्याने शेतकरी व नागरिकांना पुन्हा मागे जावे लागते.

काम न झाल्याने हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे या ठिकाणी आलेला माणूस हा मेटाकुटीला आल्या शिवाय राहत नाही. पंचायत समितीचे कर्मचारी हे कार्यालयापेक्षा चहाच्या टपरीवर जास्त प्रमाणात दिसतात. अशा मुजोर कर्मचाऱ्यामुळे नाहक नागरिकांना व शेतकऱ्यांना हेलपटे मारावे लागतात. याकडे पंचायत समितीचे गट विकास अधिकारी या गोष्टीकडे लक्ष देणार का? असा प्रश्न यावेळी उपस्थित नागरिक करत आहे.

शासकीय कार्यालयामध्ये काही कामचुकार कर्मचारी मिटिंगच्या नावा खाली आपले काम सुडून बाहेर रेंगाळत असतात यासाठी कामाच्या निमित्ताने कार्यालय सोडताना कर्मचाऱ्यांना हालचाल रजिस्टर वरील नोंद बंधनकारक करून अधिकऱ्यांनी स्वत: लक्ष देऊन तपासाण्याची मागणी शेतकरी व नागरिकांकडून केली जात आहे.

# विकासकामांसाठी मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

## भाजपाचे जालिंदर वाकचौरे यांनी दिले फडणवीसांना निवेदन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अकोलेतील विविध विकासकामां संदर्भात भाजपाचे जिल्हा परिषद माजी गटनेते, प्रदेश सदस्य जालिंदर वाकचौरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले.

नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यानिमित्त अकोलेतील विविध विकासकामां संदर्भात भाजपाचे माजी गट नेते, प्रदेश सदस्य जालिंदर वाकचौरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले. अकोले तालुक्यातील पर्यटन स्थळे, रस्ते, कोकणात वाहून जाणारे पाणी पुर्वेकडे वळविणे आदी पायाभूत सुविधांच्या मागणीचे निवेदन देवून, त्यांनी वाकचौरे यांनी, मुंबईतील वर्षानिवासस्थानी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली.

नाशिक जिल्ह्याच्या सीमेलगत अकोले तालुका आहे. कुंभमेळानिमित्त अकोलेतील अगस्ती आश्रम, राज्यातील सर्वात उंच कळसुबाई शिखर, हरिश्चंद्रगड, घाटघर, भंडारदरा, अमृतेश्वर आदी ठिकाणी पर्यटकांची सतत वर्दळ असते. निसर्गरम्य अकोलेचा परिसर दूरुन येणाऱ्या पर्यटकांना खुणावतो. या पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची कामे तत्काळ पूर्ण करावी. भक्तनिवास किंवा पर्यटक निवासाचे बांधकाम करावे.

यामुळे आदिवासीबहल अकोलेच्या आर्थिक विकासासह बेरोजगारी या दोन्ही प्रश्नांची उकल होईल. पुणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र भिमाशंकर येथून नाशिक जिल्ह्यातील सिन्नरकडे जाणारा रस्ता पूर्ण झाल्यास हे दोन्ही जिल्हे जोडले जाऊन, अकोलेतून प्रवास वेगवान होईल. दळण-वळण सोयीचे होवून, वेळेची बचत होईल, असे वाकचौरे यावेळी म्हणाले.

देवठाण येथील आढळा मध्यम प्रकल्पात बिताका येथून पश्चिमेकडे जाणारे पाणी वळविल्यास प्रकल्पाखालील तब्बल ३,९१४ हेक्टर क्षेत्राचे बारमाही सिंचन होईल. बिताक्याचे पाणी आढळेत वळविणे भविष्यासाठी गरजेचे आहे, असे वाकचौरे म्हणाले. यावेळी भाजपाचे प्रा. भानुदास बेरड, शिवाजी गोंदकर, गणेश जाधव यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

# भर पावसातही वारकऱ्यांची पंढरपूरच्या दिशेने वाटचाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** राहाता शहरात सकाळपासून ढगाळ वातावरण होते ११ च्या दरम्यान रिमझिम पावसाला सुरुवात झाली तर दोनच्या सुमारास पाऊस जोरात सुरू होता. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी राहाता शहरातून एक पालखी जात असताना त्या दरम्यान मोठ्या पावसाला सुरुवात झाली आणि यामध्ये सर्व वारकरी पुरुष, महिला भिजले विठ्ठलाच्या दर्शनाची लागलेली ओढ त्यांना न थांबून देता भर पावसात ते पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करत होते.

पावसापासून वाचण्यासाठी काहींनी अंगावर प्लास्टिकचे आच्छादन केले तर काहींकडे छत्र्या होत्या बहुतेकांकडे प्लास्टिकचे आच्छादन होते पावसाचा कुठलाही त्रास त्यांच्या चेहऱ्यावर किंवा चालताना दिसला नाही कुठलेही गडबड गोंधळ नाही शिस्तबद्धतीने दोनच्या लाईन मध्ये वारकरी चालताना दिसत होते हे या वारीचे वैशिष्ट्य आहे.

वारीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस वारकरी म्हणतात. ते वेगवेगळ्या वेशभूषेत,हातात टाळ, मृदुंग घेऊन अभंग गात गात, हरिनामाचा गजर करत पंढरपूरकडे वाटचाल करत होते अनेक जण पावसात सुद्धा विठ्ठलाच्या नामस्मरणात रंगून गेले होते.



# मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद

## ३७१४४ मालमत्ताधारकांनी भरला कर; करामध्ये ८ टक्के सवलत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नवीन आर्थिक वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरासह बिले वाटप करण्यात आले आहे. महानगरपालिका अधिनियमानुसार जून महिन्यापर्यंत सर्वसाधारण करावर ८ टक्के सवलत दिली जाते. ३० जून अखेर ही मुदत संपणार आहे. शहरातील ३७१५५ मालमत्ताधारकांनी आत्तापर्यंत सवलतीचा लाभ घेऊन कर भरला आहे. उर्वरित नागरिकांनीही ३० जून अखेर असलेल्या सवलतीचा लाभ घेऊन वेळेत कराचा भरणा करावा व दंड टाळावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीला मागील आर्थिक वर्षात नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे विक्रमी वसुली झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० अ नुसार करात एप्रिलमध्ये १० टक्के, मे व जूनमध्ये ८ टक्के अशी सर्वसाधारण करात सूट दिली जाते. या वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरानुसार बिले वाटप करण्यासाठी काही प्रमाणात विलंब झाला आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात दिली जाणारी १०% सवलत अनेकांना मिळू शकली नाही. नवीन दरानुसार बिलांचे वाटप केल्याने काहींना उशिरा बिले मिळाली. त्यामुळे नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी मे महिन्यातही १० टक्के सवलत सर्वसाधारण करावर देण्यात आली होती. या काळात ३३९२८ मालमत्ताधारकांनी २२.८५ कोटींचा कर जमा केला.

आता जून अखेरपर्यंत ८ टक्के सवलत लागू आहे. आत्तापर्यंत ३१८६ मालमत्ताधारकांनी जून महिन्यात सवलत घेऊन २.२४ कोटींचा कर जमा केला आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात ३७१५५ मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेतला. त्यातून सुमारे २५.०९ कोटी रुपयांचा कर जमा झाला आहे.

# शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त अभिवादन

**पाथर्डी :** स्वर्गीय हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

उबाठा येथे आयोजित कार्यक्रमात तालुकाप्रमुख भगवान दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला.या कार्यक्रमास शिवसेना उबाठा शहराध्यक्ष भाऊसाहेब धस, लियाकत सय्यद, बंटी माने, समीर सय्यद, हुजेफ बागवान, राजेंद्र धायतडक, सचिन मोरे, आदर्श काकडे, बय्याजी खेडकर, संदीप पालवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# त्र्यंबकराज स्वामी दिंडीचे रविवारी प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** समस्त शहरवासीयांच्या प्रेरणेने व भक्तपरिवार यांच्या सहकार्याने नामदेव महाराज शास्त्री यांच्या अधिपत्याखाली आणि बाबामहाराज मोरे, सुभाष महाराज विधाटे, भगवान महाराज मोरे ( देहूकर ) सोमनाथ महाराज माने, किशोर महाराज निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे सकाळी १० वाजता माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम व प्रिती कदम यांचे हस्ते पालखी पूजन होऊन यानंतर दिंडी पंढरीकडे प्रस्थान होणार आहे.

सोमवारी २३ जून रोजी सकाळी ८ वाजता माजी खासदार लोकनेते बापूसाहेब तनपुरे व डॉ. सौ.उषाताई तनपूरे यांच्या हस्ते राहुरी शहरात पालखी पूजन होऊन दिंडी मार्गस्थ होणार आहे. पंढरपूर येथे दिंडीचे वास्तव्य श्री त्र्यंबकराज स्वामी वारकरी सेवाश्रम (भटुंबरे) पंढरपूर येथे असणार आहे.

शनिवार दि.५ जूलै रोजी सायंकाळी ५ वाजता पंढरपूर येथे दिंडी प्रदक्षिणा होईल व ७ जूलै रोजी सकाळी महाप्रसादाचे वाटप होऊन दिंडीचा परतीचा प्रवास सुरु होणार आहे. दिंडी सोहळ्याची सांगता देवळाली प्रवरा येथिल सहारा लॉन्स, नियोजित श्री त्र्यंबकराज स्वामी वारकरी शिक्षण संस्था तथा धर्म संस्कार केंद्रा शेजारी,श्रीरामपूर रस्ता, देवळाली प्रवरा येथे शुक्रवार दि. ११ जूलै रोजी सकाळी १० ते १२ वाजता ह.भ.प. महंत उध्दव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या काल्याच्या किर्तन होऊन महाप्रसादाने होणार आहे. यावेळी संतपूजन शिलाताई सोन्याबापू जाधव या उभयतांच्या हस्ते होणार आहे.

दिंडी यशस्वीतेसाठी संस्थापक ह.भ.प. सिताराम ढुस यांच्या मार्गदर्शनाखाली श्री त्र्यंबकराज स्वामी शिक्षण व वारकरी संस्था देवळाली प्रवरा, व्यवस्थापन समिती प्रयत्नशील आहेत.

# उपजिल्हा रुग्णालयातील हलगर्जीपणाची दखल

## आमदार बंब यांनी संबंधित डॉक्टरांवर कारवाईची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** गंगापूर उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णसेवेशी संबंधित एक अत्यंत धक्कादायक आणि असंवेदनशील घटना उघडकीस आली आहे. एका गंभीर जखमी रुग्णावर वेळेवर उपचार न मिळाल्याने नातेवाईकांवर दु:खाचा डोंगर कोसळला, तर दुसरीकडे रुग्णालयातील डॉक्टरांच्या उद्धट वागणुकीने मन सुन्न करणारा अनुभव दिला.

या घटनेची आमदार प्रशांत बंब यांनी गांभीर्याने दखल घेतली असून, त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक छत्रपती संभाजीनगर यांना पत्र पाठवून तातडीने चौकशी करून संबंधित डॉक्टरावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, एका गंभीर रुग्णाला रुग्णालयात दाखल करताना डॉ. केंद्रे यांनी वापरलेली भाषा ही केवळ उद्धट नसून, ती वैद्यकीय तत्त्वांच्या आणि माणुसकीच्या सीमाही ओलांडणारी ठरली आहे, असे आमदार बंब यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.



रुग्ण अत्यवस्थ असतानाही त्याच्यावर तत्काळ उपचार करण्यात आले नाहीत. वैद्यकीय अधीक्षक डॉ. लागास यांच्याकडे तक्रार झाल्यानंतरच रुग्णाला ॲडमिट करण्यात आले, अशी माहिती नातेवाईकांनी दिली.

आमदार बंब यांनी याच घटनेच्या निमित्ताने संपूर्ण उपजिल्हा रुग्णालयाच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, ही कारवाई केवळ एका प्रकरणापुरती मर्यादित न ठेवता, एकूण रुग्णसेवा अधिक उत्तरदायी आणि माणुसकीपूर्ण व्हावी, यासाठी संपूर्ण प्रणालीचे पुनरावलोकन आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. या पत्रानंतर जिल्हा शल्य चिकित्सकांच्या स्तरावरून लवकरच चौकशी व कारवाई होण्याची शक्यता आहे. जनतेच्या सुरक्षेसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

गंभीर दुखापत असूनही रुग्णाला वेळेत दाखल न करता, ‘घरी घेऊन जा’ असा सल्ला देणं हे रुग्णसेवेतील निष्काळजीपणाचं स्पष्ट उदाहरण आहे. डॉक्टरांचा असंवेदनशील प्रतिसाद ‘वैद्यकीय अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतरच रुग्णाला भरती करून घेण्यात आलं, ही बाब व्यवस्थेतील त्रुटी दर्शवते. संबंधित यंत्रणांनी याची गंभीर दखल घ्यावी.''

– गणेश म्हैसमाळे.

## संपादकीय

### ज्येष्ठ पक्षी–वनतज्ज्ञाचा निरोप

अरण्यऋषी, वन्यजीव अभ्यासक पद्मश्री मारूती चितमपल्ली म्हणजे निसर्गातील ठेवा समाजाला नीट उमगावा यासाठी सतत कार्यरत राहणारा सकारात्मक विचाराचा ऊर्जाकोशच. त्यांनी पक्षिकोश, पाणिकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन केले. त्यांनी वन्यजीव अभ्यासक म्हणून मोठे कार्य केलेच, त्यासोबत मराठीलादेखील मोठे योगदान दिले. असा प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ आणि वृक्ष अभ्यासक आपल्यातून जाणे ही मोठी हानी म्हणावी लागेल. सोलापूरमधील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अलिकडेच त्यांना पद्मश्री पुरस्काने गौरवण्यात आले होते. चितमपल्ली यांनी पक्षिकोश, पाणिकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन केले आहे. त्यांनी वन्यजीव अभ्यासक म्हणून मोठे कार्य केलेच, त्यासोबत मराठी भाषेसाठीदेखील मोठे योगदान दिले. मारुती चितमपल्ली मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालकपदी कार्यरत असताना १९९० मध्ये ते सेवानिवृत्त झाले. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात त्यांचे विशेष योगदान आहे. अधिकृत नोंदींमध्ये चितमपल्ली यांची जन्मतारीख ५ नोव्हेंबर अशी नोंदवली गेली असली तरी, त्यांच्या आत्मचरित्रात १२ नोव्हेंबर १९३२ ही जन्मतारीख म्हणून नमूद केली आहे. मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात ३७ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधक वृत्तीने भटकंती केली. त्यांनी एकूण पाच लाख किलोमीटर प्रवास केला. त्यांना १३ भाषांचे ज्ञान होते. त्याद्वारे आदिवासी आणि इतर जमातींशी संवाद साधत त्यांनी पर्यावरणाशी संबंधित मोठी माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या आणि ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत. डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत त्यांनी पक्षीकोश, प्राणीकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केले. अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतींचे वन्य जीवन वैशिष्ट्यांसह विषद करणारी २५ पेक्षा जास्त पुस्तके त्यांनी लिहिली. चितमपल्ली म्हणजे निसर्गातील ठेवा समाजाला उमगावा या भावनेतून सतत कार्यरत राहणारा सकारात्मक विचाराचा ऊर्जाकोश होता असे म्हणता येईल. वनाधिकारी म्हणून ते ३६ वर्षे सरकारी नोकरीत होते. नोकरीदरम्यान आणि त्यानंतरही एकूण ६५ वर्षे जंगलात काढणाऱ्या चितमपल्लींनी अतिशय ओघवत्या शैलीमध्ये जंगलातील प्राणीजीवन रेखाटणारे लेखन केले. त्यांचे वाचन प्रचंड होते, पुस्तकांचीही आवड होती. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, लेखक व्यंकटेश माडगूळकर तसेच प्रसिद्ध चित्रकार ए. ए. आलमेरकर यांच्याशी त्यांचा स्नेह होता.

चितमपल्ली यांनी महाराष्ट्र सरकारच्या वनसेवेतून कारकिर्दीची सुरुवात केली. आपल्या कार्यकाळात त्यांनी महाराष्ट्रातील विविध जंगले आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये काम केले. या क्षेत्रातील त्यांच्या अनुभवांनी त्यांच्या साहित्यकृतींचा पाया घातला. ते महाराष्ट्रातील उपमुख्य वनसंरक्षक म्हणून निवृत्त झाले. चितमपल्ली यांनी वन्यजीव अभयारण्ये आणि कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यासारख्या राष्ट्रीय उद्यानांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी नागझिरा आणि मेळघाट येथे विस्थापित वन्यजीवांसाठी अनाथाश्रमांची निर्मितीदेखील केली. प्रसिद्ध मराठी लेखक गोपाळ नीलकंठ दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चितमपल्ली यांनी लेखन कौशल्य विकसित केले. या साहित्यिक योगदानाची दखल घेऊन त्यांना २००६ मध्ये सोलापूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देण्यात आले. या वनमहर्षीने आपला समृद्ध असा निसर्ग–जीवनानुभव २१ ग्रंथांमधून शब्दबद्ध केला आहे. ललित, गद्य, कथा, व्यक्तिचित्रे, आत्मचरित्र, कोशवाङ्मय, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांमध्ये त्यांनी लेखन केले. चितमपल्ली हे मुळात पक्षिशास्त्रज्ञ आणि वन्यजीव अभ्यासक. अरण्य जीवनावरील अनुभव आणि संशोधन लोकांपर्यंत पोचावे म्हणून त्यांनी ललित लेखनाची वाट अनुसरली. चितमपल्ली यांच्या ललित लेखनाने मराठी साहित्यात निसर्गचित्रणाची हिरवी वाट निर्माण केली. निसर्ग आणि माणूस यांच्यातील नात्याचा शोध त्यांच्या ललित प्रतिभेने घेतला. 'वनविद्येचे तत्त्वज्ञ ललित गद्यकार' म्हणून समीक्षकांनी त्यांना गौरवले आहे. अनेक झळकती मानचिन्हे देऊन चितमपल्ली यांच्या ललित लेखनाचा, वनविद्येच्या अभ्यास आणि संशोधनाचा गौरव करण्यात आला. तीन वेळा महाराष्ट्र राज्य पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१६), दमाणी साहित्य पुरस्कार (१९९१), फाय फाउंडेशन पुरस्कार (१९९१), अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषदेचा सन्मान (१९९६), महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार (२००३), वेणू मेमन लाइफटाइम अचीव्हमेंट अवॉर्ड (२००७), नागभूषण पुरस्कार (२००८), वसुंधरा सन्मान (२००९), भारती विद्यापीठ जीवनसाधना पुरस्कार (२०१३) अशा अनेक सन्मानांचे ते धनी ठरले. १९८७ मध्ये नासिक येथे झालेले पहिले पक्षीमित्र संमेलन, २००० मध्ये औदुंबर येथे झालेले ५७ वे विदर्भ साहित्य संमेलन, २००० मध्ये उमरखेड येथे झालेले ५१ वे विदर्भ साहित्य संमेलन आणि २००६ मध्ये सोलापूर येथे झालेले ७९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अशा अनेक संमेलनांच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना लाभला. निसर्ग चैतन्यमय आहे, सारे अरण्य म्हणजे एक प्राणमय जीव आहे, त्याला त्याचे स्वतंत्र व्यक्तित्व आहे, ही निसर्गाकडे पाहण्याची स्वतंत्र आणि व्यापक दृष्टी चितमपल्ली यांच्या निसर्गलेखनाला वेगळेपण मिळवून देते. चितमपल्ली यांच्या ललित साहित्याचा एक लक्षणीय विशेष असा की, अरण्यविद्येतून प्राप्त झालेली शास्त्रीय माहिती अतिशय लालित्यपूर्ण आणि रोचक स्वरूपात त्यात येते. शास्त्रीय ज्ञान आणि लालित्य यांचा सुरेख मेळ त्यांच्या साहित्यात पहायला मिळतो. नाना रसभावनांनी त्यांचे लेखन अंतर्बाह्य फुलले आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या भाराने ते वाकले नाहीत. शास्त्रीय ज्ञान ललित रूप धारण करून मांडण्याचे अप्रूप त्यांच्या ललितगद्यात पहायला मिळते. सृष्टीच्या माहीतगाराने अत्यंत रसज्ञ वृत्तीने केलेले हे लेखन आहे. त्यातून वनविद्येचे, अरण्यानुभवाचे अस्पर्श, अनोखे असे हिरवे जग मराठी साहित्यात आले. त्यांच्या ललित लेखनाने मराठी साहित्याच्या अनुभवाच्या कक्षा रुंदावल्या.

# आर्थिक मानांकनाच्या पलिकडे...

**परामर्श**

**– हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार**



जागतिक अर्थकारणात गेल्या काही काळात बरेच तरंग उमटत आहेत. त्याच वेळी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२५–२६ मध्ये भारत आर्थिक महासत्तापदाच्या बाबतीत जपानवर मात करेल, असा अंदाज व्यक्त केला. खरे तर हे वर्ष अद्याप संपायचे आहे. त्यामुळे आत्तापासूनच आरोळ्या ठोकण्याची गरज नाही. त्यातही जीडीपी हा अर्थव्यस्थेचा एक घटक वाढला म्हणजे सर्वांगीण प्रगती होते असे नाही.

सध्या जगातील बहुतांश अर्थव्यवस्थांचा वेग मंदावला असला, तरी भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग मात्र कायम आहे. परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसा काढून घेत असले, तरी त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झालेला नाही. भारताची मोठी बाजारपेठ, मध्यमवर्गीयांची संख्या, जगातील सर्वाधिक कमावते हात हे भारताचे वैशिष्ट्य आहे. आणखी तीस महिन्यांमध्ये भारताची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकाची होईल. तिसऱ्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावरची उडी मात्र सोपी नसेल. त्याचे कारण सध्या दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या चीन आणि चौथ्या क्रमांकावर असलेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेच्या आकारात मोठे अंतर आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेपेक्षा चीनची अर्थव्यवस्था चौपटीहून मोठी आहे, तर अमेरिकेची अर्थव्यवस्था साडेसातपटींहून मोठी आहे. भारताने २०४७ मध्ये जागतिक महासत्ता व्हायचे ठरवले आहे. त्याच वर्षी चीनच्या सत्ताधारी पक्षाला सत्तेत येऊन शंभर वर्षे होत आहेत. चीनलाही जागतिक महासत्ता व्हायचे आहे. अमेरिकाही हे स्थान हातून सहजासहजी जाऊ देईल, असे नाही. भारताच्या जलद वाढीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत बदल होत आहेत. यामुळे भारताला त्याच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय समकक्षांपेक्षा लक्षणीय फायदा मिळतो. मजबूत देशांतर्गत मागणी आणि अनुकूल लोकसंख्याशास्त्रीय ट्रेंडमुळे भारताची अर्थव्यवस्था वाढत राहील, असे जागतिक नाणेनिधीच्या आकडेवारीवरून दिसून येते.

जपान मागे राहण्याची अनेक कारणे आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेत अनिश्चितता कायम आहे. अनेक विकसित अर्थव्यवस्थांवर व्यापारी तणाव आणि धोरणातील बदलांचा परिणाम झाला आहे. यामध्ये जपानचाही समावेश आहे. बाह्य दबावांमुळे जपानच्या आर्थिक भवितव्याला धक्का बसला आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्काचा नकारात्मक परिणाम झाला आहे. जपानची लोकसंख्या वृद्ध होत आहे आणि कामगारांची संख्या कमी होत आहे. या दीर्घकालीन संरचनात्मक समस्या आहेत. त्या विकासात अडथळा आणत आहेत. भारत चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणे ही एक महत्त्वाची कामगिरी आहे. ती जागतिक स्तरावर त्याची वाढती ताकद दाखवते; पण अर्थव्यवस्थेच्या इतर अंगांचा विचार केला, तर चित्र इतके आशादायक नाही. जीडीपीच्या बाबतीत जपानला मागे टाकले असले, तरी दरडोई उत्पन्न, आयुर्मान, उत्पादन, सामाजिक सुरक्षा, शिक्षण, रोजगार आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात जपान भारतापेक्षा खूप पुढे आहे. २०२५ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न सुमारे २,८००–२,९३७ डॉलर असेल. ते जपानच्या दरडोई उत्पन्नापेक्षा (३३,१३८ ते ५३,०५९ डॉलर) सुमारे बारापट कमी आहे. भारताच्या प्रचंड लोकसंख्येमुळे दरडोई जीडीपी खूपच कमी आहे. जपानच्या दरडोई उत्पन्नामुळे तेथील नागरिकांचे राहणीमान, खर्च करण्याची क्षमता आणि राहणीमानाचा दर्जा भारतापेक्षा खूपच चांगला आहे. उत्पन्नातील असमानता आणि ग्रामीण–शहरी तफावत या भारतातील प्रमुख समस्या आहेत. दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी, समावेशक वाढ, शेतीवरील अवलंबित्व कमी करणे आणि प्रादेशिक असमानता कमी करणे आवश्यक आहे.

एखाद्या देशातील लोकांचे सरासरी आयुष्यमान त्या देशातील अर्थव्यवस्था, संसाधने आणि वैद्यकीय सुविधांवर थेट अवलंबून असते. २०२१ मध्ये भारतातील आयुर्मान सुमारे ६९–७० वर्षे होते, जे जागतिक सरासरीपेक्षा कमी आहे. आरोग्य सेवांवरील खर्च जीडीपीच्या फक्त १.२ टक्के आहे, तर जपान हा जगातील अशा देशांमध्ये समाविष्ट आहे, जिथे आयुर्मान जगात सर्वात जास्त आहे. येथील लोकांचे सरासरी वय ८४–८५ वर्षे आहे. याचे कारण जपानने आरोग्य क्षेत्रात खूप पैसा खर्च करुन आपल्या आरोग्य सेवा मजबूत केल्या आहेत. येथे लोकांना पौष्टिक अन्न मिळते आणि या देशाची सामाजिक सुरक्षा व्यवस्था मजबूत आहे. भारतातील साक्षरता दर ७७.७ टक्के आहे; परंतु येथे दर्जेदार शिक्षण आणि कौशल्य विकासाचा अभाव आहे. ग्रामीण भागात शाळांची स्थिती आणि शिक्षकांची कमतरता या प्रमुख समस्या आहेत. जिथे शिक्षकांच्या कौशल्यांबद्दल आणि गुणवत्तेबद्दल प्रश्न उपस्थित केले जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर अणुबॉम्बस्फोटांनी उद्ध्वस्त झालेल्या जपानचा साक्षरता दर सुमारे शंभर टक्के आहे. त्याची शिक्षण व्यवस्था तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणात जगात आघाडीवर असून शिक्षण आणि कौशल्य विकास जगासाठी अनुसरणीय आहे. जपानच्या टेक कंपन्या, कार कंपन्या आणि उत्पादन कंपन्या जगात पहिल्या क्रमांकावर आहेत. भारतात शिक्षणावरील खर्च सध्या जीडीपीच्या चार टक्क्यांपेक्षा कमी आहे. याचा विस्तार करण्याची, शिक्षक प्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

जागतिक पातळीवर अनिश्चिततेचे वारे वहात असतानाच देशांतर्गत भांडवली बाजारात सूचीबद्ध असलेल्या आघाडीच्या ५०० कंपन्यांचा नफा २९ टक्क्यांनी वाढला आहे. तसेच चालू महिन्यातच सहा कंपन्या २० हजार कोटी रुपयांची भांडवल उभारणी करणार आहेत. या सर्व बातम्या आनंददायक आहेत. चालू वर्षअखेरीस भारताचा नॉमिनल जीडीपी (ज्यात महागाईचा दर ॲडजस्ट केलेला नसतो) हा ४१८७.०१७ डॉलर्स असेल. त्यावेळी जपानचा जीडीपी ४१८६.४३१ अब्ज डॉलर्स इतका असेल, असा अंदाज आहे. म्हणजे भारत ०.५८६ डॉलर्सने जपानच्या पुढे असेल, असा होरा आहे. यंदा मे महिन्यातील विक्रमी पावसामुळे पाणीटंचाईची समस्या हलकी झाली आहे. तसेच भारतीय हवामान खात्याने पाऊसपाणी उत्तम असेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. शिवाय शेतमालाच्या आधारभावात केंद्र सरकारने समाधानकारक वाढ केली आहे. परिणामी, कृषी उत्पादन भरघोस येईल, असे मानण्यास जागा आहे. परंतु उत्पादनक्षेत्र आणि सेवाक्षेत्र यांचीही कामगिरी चांगली होणे आवश्यक आहे. भारताचे दरडोई उत्पन्न आज जपानच्या बारापट कमी आहे. शिवाय आयएमएफ ही आकडे व माहिती जमा करणारी संस्था नव्हे. ती वेगवेगळ्या देशांची सरकारी आकडेवारी पाहते आणि निष्कर्ष काढते. ती तिची स्वतःची आकडेवारी नसते. या रेडिमेड आकडेवारीमध्ये अनंत चुका होण्याची शक्यता असते. भारताची संख्याशास्त्रीय आकडेवारी विश्वासार्ह नाही, असे सरकारमधील अनेक तज्ज्ञांनीही म्हटले आहे. यापूर्वी नाणेनिधीचे अनेक अंदाज चुकले आहेत.

भारताचा शेजारी देश असलेला चीन हा जबरदस्त वेगाने प्रगती करत होता. परंतु अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी केलेल्या काही धोरणात्मक चुकांमुळे गेल्या पाच–दहा वर्षांमध्ये तेथेही समस्या उद्भवल्या. साम्यवाद बाजूला ठेवून भांडवलशाहीचा स्वीकार केल्यानंतर चीनच्या आर्थिक विकासाचा वेग वाढला. भांडवलशाही देशांमध्ये स्वित्झर्लंड हा महत्त्वाचा देश आहे. स्वित्झर्लंडचे वार्षिक दरडोई उत्पन्न अमेरिकेपेक्षाही जास्त आहे. व्हिएतनाममध्ये पूर्वी समाजवादी अर्थव्यवस्था होती, परंतु उदारीकरणानंतर तेथे भारतापेक्षा अधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करून घेण्यात आली. तंत्रज्ञानाच्या बळावर तैवानने प्रगती केली. भारतात आजही अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप जास्त आहे. शिवाय शेतीमाल आणि अन्य वस्तूंच्या आयात–निर्यात धोरणात सातत्याने बदल होत असतात. आत्मनिर्भरतेच्या धोरणांचा गजर करतानाच आयात नियंत्रणे आणून देशी उद्योगांना संरक्षण देण्याच्या नावाखाली दुबळे बनवले जात आहे. मोठी अर्थव्यवस्था बनणे याचा अर्थ जगामध्ये एक आर्थिक शक्ती म्हणून भारताचा उदय होत आहे, ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे परदेशी भांडवल येईल. वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत उद्योग, सेवा क्षेत्र आणि स्टार्टअप्स यांचा विस्तार होतो. भारतात अक्षय ऊर्जा, आयटी आणि उत्पादन क्षेत्रात रोजगार वाढत आहे. त्याच वेळी भारताची लोकसंख्या १४२ कोटींवर गेली आहे. त्यामुळे दरडोई पातळीवर जीडीपीचे लाभ कमी होतात. दरडोई उत्पन्न जास्त असल्यास लोकांची खरेदीशक्ती वाढते. त्यामुळे अर्थव्यवस्थेला जोम प्राप्त होते. सरकारचा महसूल वाढवून सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्य यावर सरकार चांगल्या प्रकारे खर्च करू शकते. आज अमेरिकेचे दरडोई उत्पन्न ७५ लाख रुपये असून चीनचे ११ लाख, जर्मनीचे ४७ लाख, जपानचे २८ लाख तर भारताचे केवळ दोन लाख सव्वीस हजार रुपये आहे. भारताचा नॉमिनल जीडीपी हा ब्रिटनपेक्षा जास्त आहे. परंतु गेल्या चार वर्षांमध्ये भारताचे दरडोई उत्पन्न ६०० डॉलर्सने वाढले तर ब्रिटनचे ८००० डॉलर्सने हे लक्षात घ्यायला हवे. भारताचे सरासरी दरडोई उत्पन्न वाढले, तर अर्थव्यवस्थेला अधिक लाभ होईल. जपान आणि भारतात अजून खूप अंतर आहे. तेव्हा आपण जमिनीवरच राहिले पाहिजे.

## प्रवरेच्या गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा ९७ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय, लोणी या महाविद्यालयाच्या बी एससी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागाचा तृतीय वर्षाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे मार्फत घेण्यात आलेल्या एप्रिल २०२५ परीक्षेचा निकाल ९७ टक्के लागला.

विभाग प्रमुख डॉ. संजय वाणी, डॉ. राजश्री तांबे, डॉ. सुरेखा काळे, प्रा. अर्चना घोगरे, प्रा. गोंधळी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील,

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदिप दिघे यांनी अभिनंदन केले आहे.

चैताली सतीश नानेकर आणि साक्षी अशोक बोठे यांनी ९.५३ सीजीपीए मिळवून प्रथम क्रमांक सारिका संजय जाधव हिला ९.३८ आणि थोरात श्रद्धा नानासाहेब ९.२६ सिजिपीए मिळवून द्वितीय तर तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

**– प्राचार्य डॉ. अनुश्री खैरे**

## केडगाव रेणुका माता विद्यालयात नवागतांचे स्वागत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : रेणुका माता प्राथमिक विद्यालय केडगाव या शाळेत नवोगताचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण समारंभ उत्साहात साजरा झाला.

यावेळी भाग्योदय विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, प्रमुख पाहुणे डॉ. बागले, रेणुका माता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, पालक प्रतिनिधी प्रल्हाद नाकाडे व माने उपस्थित होते.

इयत्ता पहिलीच्या नवीन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नरवडे यांनी केले व शाळेची माहिती दिली. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये शाळेचे अनेक गुणवंत विद्यार्थी झळकत असतात. यावेळी केरूळकर यांनी आभार मानले.

## स्नेहालयाच्या स्वयंसेविकांना रेनकोटसह पावसाळी किट भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बालविवाह मुक्त जिल्हा करण्यासाठी कार्यरत असलेल्या स्नेहालय संचलित उडान प्रकल्प आणि शहराच्या झोपडपट्टी भागात शिक्षणातून पुनर्वसनाचे कार्य करणाऱ्या बालभवन मध्ये कार्यरत महिला स्वयंसेविकांना पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मराठी पत्रकार परिषदच्या वतीने रेनकोटसह पावसाळी किटचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून तोफखाना पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण, पत्रकारांच्या नाशिक विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख,उडानचे व्यवस्थापक प्रवीण कदम, बालकल्याण समिती सदस्य ॲड. अनुराधा येवले, बालभवन प्रकल्पाच्या व्यवस्थापिका उषा खोलम, मुक्ती वाहिनीचे समन्वयक शाहीद शेख, नवेद शेख आदींसह उडान व बालभवनच्या महिला स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण म्हणाल्या की, समाजातील शेवटच्या घटकांसाठी झटणाऱ्या हाताला सातत्याने बळ देण्याचे कार्य शहरात मराठी पत्रकार परिषद करत आहे. समाजातील प्रश्न मांडत असताना सामाजिक संवेदना जागरुक ठेवून त्यांना मदतीचा हात पुढे करण्याचे पत्रकारांचे कार्य अभिमानास्पद आहे. फक्त प्रश्न मांडून न थांबता ते तडीस नेण्याचे कार्य केले जात आहे. यापूर्वी देखील त्यांच्या महिला दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होवून मिळालेला सन्मान देखील आठवणीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विजयसिंह होलम यांनी सर्वच प्रश्न शासकीय यंत्रणेद्वारे सुटू शकणार नाही. यासाठी समाजात उतरुन या प्रश्नासाठी लढाई करावी लागणार आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### शेतमाल प्रक्रिया उद्योगास पाच कोटींची मदत : मंत्री कोकाटे

रासायनिक शेती व व्यावसायिकांना सध्या परवानगी देणे बंद केले आहे. बदलते हवामान, श्वाश्वती नसलेली पिके, मजुरांचा अभाव यामुळे सध्या तरुणवर्ग शेतीकडे येत नाही. त्यांना शेतीत रस निर्माण व्हावा, या क्षेत्राकडे त्यांनी आधुनिक उद्योग म्हणून पहावे यासाठी पूरक धोरण ठरविण्यात येत आहे. भविष्यात जनतेच्या आरोग्यासाठी आणि जनतेकडून होत असलेल्या मागणीनुसार शासनाच्या वतीने शेतीला प्राधान्य देण्यात येत आहे. खते, बियाणे यांची बोगसगिरी थांबविण्यासाठी विशेष मोबाइल यंत्रणा तयार करण्यात आली आहे. त्याद्वारे अधिकृत व अनधिकृत बियाणे, खते कशी ओळखावीत, याची संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेतकऱ्यांनीदेखील खरेदी केलेली बियाणे, खते आणि औषधे यांची खरेदी पावती घेण्याची गरज आहे. त्यामुळे त्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात आपोआपच पुरावा उपलब्ध होऊ शकेल व अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलून शासनाद्वारे त्वरित कायदेशीर कारवाई करणे शक्य होईल व असे प्रकार रोखता येतील, असे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

### हार, बुके स्वरूपात शुभेच्छा स्वीकारणार नाही : कोल्हे

करण्यात येते. नागरिक, कार्यकर्ते आणि संस्था यांच्या सहकार्याने हे उपक्रम भव्य स्वरूपात पार पडतात. या संकल्पनेतून, वाढदिवस केवळ औपचारिकतेपुरता न राहता, तो समाजासाठी प्रेरणा देणारा आणि उपयुक्त दिवस ठरतो. नागरिकांनीही हार–तुरे, बुके न देता, सामाजिक उपक्रमांत भाग घेऊन शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. 'शुभेच्छा जनसेवेच्या कृतीतून' ही संकल्पना रूजवणारे बिपीन कोल्हे आजच्या काळात समाजप्रबोधनाचा आदर्श उदाहरण ठरले आहेत.

### 'डॉ. तनपुरे'च्या चेअरमनपदी तनपुरे

व व्हा. चेअरमन कोण होणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. काल, दि. १९ जून २०२५ रोजी सकाळी कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक, सभासद व जनसेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत चेअरमनपदाची निवड प्रक्रिया पूर्ण झाली. यावेळी अरुण तनपूरे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. अरुण तनपूरे यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याने संचालक, सभासद व कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला.

### निमगाव खैरीत दोघांवर प्राणघातक हल्ला

लायकी नाही' असे जातिवाचक अपमानकारक शब्द वापरून हिणवले. त्यानंतर आम्ही हिंदू राजपूत आहोत, असे म्हणत दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि हॉटेलमधून हाकलून लावले. या अपमानास्पद व हिंसक प्रकारानंतर दिपक तुपे आणि त्यांचे वडील पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात असताना, निमगाव इंद्रा नगर झोपडपट्टी भागातील शिवा टेलरच्या दुकानासमोर त्यांना अडवून, आरोपी निलेश परदेशी याने धमकी दिली की, आमच्याविरुद्ध तक्रार देतात? आम्ही खैरीचे बाप आहोत, तुम्हाला जिवंत ठेवणार नाही, असे म्हणून लाकडी दांडक्याने आणि टोकदार हत्याराने दोघांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात दोघांनाही गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे हे करीत असून सध्या शुभम हुसले या आरोपीला अटक करण्यात आली असून अन्य आरोपी अद्याप फरार आहेत.

### जि. प. गट अन् गण समिती गठित

स्तरावर समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले असून समितीची सदस्य कोण असणार हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी मंगळवारी आदेश काढले आहेत.यात आदेशात जिल्हा व तालुकास्तरीय समितीचे अध्यक्षपद हे जिल्हाधिकारी यांच्याकडे राहणार आहे. तर जिल्हा समितीमध्ये उपजिल्हाधिकारी महसूल, तहसीलदार सामन्य प्रशासन व संगणक तज्ज्ञ हे सदस्य असणार आहेत. त्याप्रमाणे तालुकास्तरावर जिल्हाधिकारी अध्यक्ष राहणार असून सदस्य म्हणून उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायक तहसीलदार, संगणक तज्ज्ञ असे पाच जण तालुकास्तरावर तर चार जण जिल्हास्तरीय समितीमध्ये राहणार आहे.प्रारुप प्रभाग रचना राज्य शासनाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्याची जबाबदारी संबंधित समितीवर राहणार आहे. प्रारूप तयार करणे, तहसीलदारांनी तयार केलेला कच्चा आराखडा प्रभाग रचना समितीसमोर ठेवण्यात येईल, ही समिती हा अधिनियमातील तरतूदी, नियमातील तरतूदी व या आदेशातील तरतूदींचे पालन करून तयार केला आहे हे तपासले.ही समिती प्रारूप प्रभागर रचनेचे नकाशे योग्य रितीने तयारद करून तपासून पाहिले. अन्यथा योग्य नकाशे तयार करून घेण्याची कार्यवाही करणार आहे.

### अकोलेत एकाला साडेसहा लाखांना गंडा

घेतलेली पिकअप गाडी फायनान्सवाले घेऊन गेले.याबाबत फिर्यादी यांनी आरोपीला सांगितले असता त्याने दमदाटी करून शिवीगाळ केली. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात आरोपी एजंट महंमद शेखविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेख करीत आहेत.

### सर्वगुणसंपन्न नागरीक घडविण्यासाठी संजीवनी कटिबध्द : कोल्हे

उपस्थित होते. यावेळी नव्याने प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. सर्व प्रथम सरस्वती देवी व स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर शालेय बॅन्ड पथकाने देश भक्तीपर गीत गात व सशस्त्र दलाने उभारलेल्या कमानीमधून सुमित कोल्हे यांनी पुष्प गुच्छ देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सांगळे यांनी विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील संधी व संस्थेचे विविध मानस स्पष्ट केले. प्राचार्य दरेकर यांनी शाळेची नियमावली स्पष्ट केली.

## चौंडी-इंदौर बस चापडगाव मार्गे न्यावी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड एसटी आगाराने नव्याने सूरू केलेली चौंडी - इंदौर बस जामखेड हून झिक्री, नान्नज, जवळा, हाळगाव, चौंडी, चापडगाव मार्गे अहिल्यानगर, इंदौर या मार्गे चालवण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे. यामार्गे बस चालवणे प्रवाशांच्या दृष्टीने सोईस्कर होणार असल्याने प्रवाशांचा वेळ आणि पैसे वाचणार आहेत.

याबाबत चौंडी ग्राम पंचायतीच्या वतीने राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अहिल्यानगरचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, जामखेडचे आगारप्रमुख प्रमोद जगताप यांना निवेदन दिले आहे. बुधवारी (ता.१८) चौंडीचे सरपंच अविनाश शिंदे व ग्रामविकास अधिकारी सुरेश पुरी यांनी जामखेड आगाराचे सहाय्यक वाहतूक निरिक्षक महादेव ढगे व नितीन दाणी यांना समक्ष भेटून निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, चौंडीहून जामखेड मार्गे अहिल्यानगरला जाण्यासाठी तब्बल तीन तास वेळ लागणार आहेत. त्याचबरोबर तिकीटासाठी पैसे जास्त लागणार आहेत. जाम खेडहून पहाटे पाच वाजता बस निघाल्यानंतर चौंडीपर्यंत प्रवाशी मिळत नाहीत. परत चौंडीहून जाम खेड पर्यंत सकाळी सहा वाजता किती प्रवाशी मिळतात याबाबत साशंकता आहे.

# अवैध वाळू उपशाबाबत संयुक्त कारवाई करावी

## जिल्हाधिकारी पंकज आशिया; विविध कामांचा घेतला आढावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : अवैध वाळू उपशाबाबत संयुक्त कारवाई करावी, असे आदेश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी महसुल अधिकारी तसेच पोलिसांना दिले आहेत.

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच कोपरगाव तालुक्याचा अचानकपणे दौरा करीत विविध कामांचा आढावा घेतला. याबाबत जिल्हाधिकारी महोदयांचे कोपरगाव तहसील कार्यालयामध्ये प्रथम आगमन झाले त्या ठिकाणी कोपरगाव चे तहसीलदार महेश सावंत यांनी त्यांचे स्वागत केले यानंतर डॉ. पंकज आशिया यांनी तहसील कार्यालयामध्ये प्रवेश करतात तेथील सर्व विभागांच्या कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. त्यानंतर तहसीलदार यांच्या दालनात सर्व शासकीय विभागांची आढावा बैठक घेऊन ज्या त्या विभागांचा प्रत्यक्षपणे कामाचा आढावा घेतला.

शासनाच्या ज्या विविध योजना आहेत, त्या योजना गाव पातळीपर्यंत पोहोचल्या की नाही? याची माहिती घेऊन तसेच जे काही कामे प्रलंबित आहेत, याची वर्गवारी करून ते त्वरित मार्गी लावावे तसेच शासनाच्या योजना राबवित असतांना त्यामध्ये येणाऱ्या अडचणी यावर त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

दुपारच्या सत्रामध्ये डॉ.आशिया यांनी ग्रामीण रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देऊन तेथील रुग्णांना मिळणाऱ्या सेवा सुविधांबाबत वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिरीष गुट्टे यांच्याकडून माहिती घेतली. जिल्हाधिकारी सायंकाळी अहिल्यानगरकडे निघाले असता त्यांचा ताफा अचानकपणे शहरातील कापड बाजार परिसरात जाऊन थांबला. डॉ. पंकज आशिया यांनी तेथील सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधत नगरपरिषद देत असलेल्या सेवा सुविधांबाबत सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधला.तसेच आपल्या घरातील कचरा परिसरातील कचरा संकलन करण्यासाठी दररोज नगरपरिषदेची घंटागाडी येते का? ती किती वाजता येते? याबाबत माहिती जाणून घेतली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कचरा डेपोची पाहणी केली.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुहास जगताप, आरोग्य निरीक्षक सुनील आरणे, प्रांताधिकारी माणिक आहेर, तहसीलदार महेश सावंत आदि सह अनेक अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी यांनी खत प्रकल्पाची पाहणी करून मुख्याधिकारी सुहास जगताप यांना काही सूचना केल्या.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया कोपरगाव दौऱ्यावर येणार समजताच कोपरगाव नगरपरिषदेने चौकामध्ये कचरा संकलन करणाऱ्या गाडीचा नंबर व माहितीचा फ्लेक्स तयार करून लावल्यामुळे कोपरगाव शहरांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांचे या बोर्डाकडे लक्ष जात होते. जिल्हाधिकारी येणार असल्यामुळे हे फ्लेक्स लावण्यात आले खरे पण याची आता नगरपालिका अंमलबजावणी करणार का? याबाबत नागरिकांमध्ये साशंकता निर्माण होत आहे.

# संत निवृत्तीनाथांच्या पालखीचे जोरदार स्वागत

## श्रीरामपुरात भक्तीमय वातावरण; वारकऱ्यांना अल्पोपहाराचे ठिकठिकाणी वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : संतपरंपरेतील सर्वोच्च अधिष्ठान असलेल्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त आणि आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या सर्व वारकरी बांधवांचे श्रीरामपूर नगरीत उत्साहात, श्रद्धेने व सेवाभावी वृत्तीने स्वागत करण्यात आले.नॉर्दर्न ब्रँच येथे पालखीचे आगमन होताच आ. हेमंत ओगले, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी नगराध्यक्ष करण ससाणे, प्रांताधिकारी सावंत, तहसीलदार मिलिंद वाघ आदिंनी पालखीचे दर्शन घेत स्वागत केले. संगमनेर रोड तसेच मेनरोडवर ठिकठिकाणी विविध संघटनांच्यावतीने वारकऱ्यांना अल्पोपहार देण्यात आला. श्रीराम मंदिराजवळ वारकऱ्यांना व्यापारी व हमाल माथाडी कामगारांच्यावतीने भोजन देण्यात आले. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

या स्वागत सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे तृतीयपंथी समाजाच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. तृतीयपंथी गुरु पिंकी हाजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रीरामपूरमध्ये पालखी मार्गावर थांबलेल्या वारकऱ्यांचे अत्यंत प्रेमपूर्वक स्वागत करत त्यांना बिस्किटांचे वाटप केले. त्याचप्रमाणे वारीच्या या थोर परंपरेत सहभाग घेणाऱ्या इतर सेवाभावी नागरिकांनीही आपली जबाबदारी निभावत वारकऱ्यांची सेवा केली.

# थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करा

## मुख्याधिकाऱ्यांकडे डॉ. अमोल फडके यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**


**शेवगाव** : शेवगाव नगरपरिषदेच्या हद्दीत अनेक नागरिकांचा मालमत्ता कर थकलेला आहे. या मालमत्ता करावर नगरपरिषदेने दरमहा २ टक्के लावलेली शास्ती माफ करावी, अशी मागणी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष डॉ. अमोल फडके यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी अध्यक्ष बब्रु वडघणे, शहराध्यक्ष किशोर कापरे, विद्यार्थी संघटना अध्यक्ष महेश काटे, राजेंद्र गिरगे आदी उपस्थित होते.



निवेदनात म्हटले आहे, शास्ती किंवा व्याज लावल्याने अनेक मालमत्ता धारकांच्याथकबाकीत वाढ झाली आहे. जेवढी थकबाकी आहे, त्याच्यापेक्षा दुप्पट किंवा त्यापेक्षा जास्त शास्तीची रक्कम झालेली आहे. त्यामुळे अनेकांना ही थकबाकी भरायची आहे, परंतु या जास्तीच्या रकमेमुळे अनेक मालमत्ताधारक थकबाकीचा कर भरण्यास असमर्थ आहेत. त्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार शास्ती माफ करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## व्यापाऱ्यावर हल्ल्याचा केडगावात प्रयत्न

**जनता आवाज वृत्तसेवा**




**अहिल्यानगर** : छत्रपती संभाजीनगर येथील व्यापाऱ्यालात्यांच्याशी असलेल्या व्यावसायिक रोष मनात धरून पाठलाग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना केडगाव शिवारात घडली. अमोल ओमप्रकाश लड्ढा (वय ४०, रा. उदय बंगला, शिल्पनगर, आर. टी.ओ. रस्ता, छत्रपती संभाजीनगर) असे व्यापाऱ्याचे नाव असून त्यांनी मंगळवारी (१७जून) दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात एमएच १६ सीव्ही ८३३४ या कार मधील अज्ञात चालक व त्याच्यासोबत असलेल्या अज्ञात दोन ते तीन व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी (१६ जून) सकाळी १० वाजता लड्ढा हे व्यापाराच्या दृष्टीने पोलिसात गुन्हा दाखल; व्यावसायिक स्पर्धे तून प्रकार रांजणगाव एमआयडीसी येथे मिटींगसाठी त्यांच्या एमएच २० एफई २५५० या कारने गेले होते. दुपारी १.३० वाजताच्या सुमारास ते कंपनीत पोहोचले. मिटींग दुपारी ३.३० वाजता संपल्यानंतर लॉबीमध्ये त्यांना व्यापारी सुरेश धोंडीबा गवळी व सुदीप गाजरे हे संशयास्पद नजरेने पाहताना दिसले. व्यवसायविषयक मतभेद असल्यामुळे यांच्यावर संशय निर्माण झाला. लड्ढा ब्रिटानिया कंपनीतून बाहेर पडल्यावर अहिल्यानगर- पुणे रस्त्यावर हॉटेल निल जवळ त्यांच्या कारचा दुसऱ्या कारने पाठलाग सुरू केला. लड्ढा यांनी केडगाव बायपासमार्गे दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, परंतु संबंधित कारने पाठलाग थांबवला नाही.

४.४५ वाजताच्या सुमारास रंगोली चौकाच्या अलिकडे सदर कार चालकाने लड्ढा यांच्या कारला डाव्या बाजूने ओव्हरटेक करत आडवी कार लावली. कारमधून दोन ते तीन अनोळखी इसम बाहेर आले. त्यांच्या हातात लाकडी दांडे व लोखंडी रॉड होते. या हत्यारांचा इशारा करत त्यांनी धमकीवजा हालचाली केल्या आणि कारला धडक देऊन डाव्या बाजूचे दोन्ही दरवाजे नुकसान केले. हल्ल्याच्या भीतीने लड्ढा यांनी आपली कार हॉटेल आयरिस येथे नेऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली.दरम्यान, पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास सुरू केला आहे.

# करंजी घाटात सहा वाहनांचा एकाच वेळी अपघात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील कल्याण निर्मळ या राष्ट्रीय महामार्गावरील करंजी घाटामध्ये गुरुवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास नगरकडून पाथर्डीकडे जाणाऱ्या ट्रकने समोरून येणाऱ्या एसटी बस, इनोव्हा कार, टेम्पो, जीप आणि मोटरसायकल अशा जवळपास पाच वाहनांना धडक दिल्याने या अपघातामध्ये एसटी बस मधील दोन प्रवासी गंभीर जखमी झाले.तसेच मोटर सायकलस्वार, इनोव्हा कार, टेम्पो, जीप मधील प्रवासी देखील किरकोळ जखमी झाले आहेत.

पाथर्डीहून कल्याणकडे जाणाऱ्या विठ्ठलवाडी डेपोच्या एसटी बसमधील जखमी प्रवाशांना तात्काळ तिसगाव येथील सरकारी दवाखान्यात पाठवण्यात आले. अपघातानंतर मात्र ट्रकचा चालक ट्रक घटनास्थळी सोडून पसार झाला. एकाच वेळी सहा वाहनांचा अपघात झाल्यामुळे करंजी घाटात मोठी वाहतूक कोंडी झाली होती. अपघात नेमकी कोणत्या वाहनाचा झाला आणि कशामुळे झाला. याबाबत काही वेळ मोठी संभ्रम अवस्था निर्माण झाली. एका ट्रकमुळे इतर पाच वाहनांचे अपघात या ठिकाणी झाले असुन या अपघातामध्ये सर्व वाहनांचे मोठे नुकसान देखील झाले आहे.

### धोकादायक वळणावर अपघात

माणिकशहा पिरबाबा दर्गा जवळील धोकादायक वळणावरच हा अपघात झाल्याने या ठिकाणी घाटातील दोन्ही बाजूने वाहनांची लांबलचक रांग लागली होती. काही वेळाने या ठिकाणी राज्य पोलीस महामार्ग विभागाचे कर्मचारी आल्यानंतर त्यांनी वाहतूक सुरळीत केली. सातत्याने या धोकादायक वारणा जवळ वाहनांचे अपघात होत आहेत.

## कांदा बियाण्याच्या बॉक्सची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : येथील मार्केट यार्डमधील जगदंबा कृषी सेवा केंद्र या दुकानातून अज्ञात चोरट्याने ३७हजार ५०० रूपये किंमतीचे येलोरा कंपनीचे कांदा बियाण्याचे बॉक्स चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी दुकानाचे मालक सागर श्रीप्रकाश तिपुळे (वय ३२ रा. संदीपनगर, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी सागर तिपुळे हे मार्केट यार्डमधील गाळा क्रमांक १ व २ येथे कृषी सेवा केंद्र चालवतात. नेहमीप्रमाणे मंगळवारी (१७ जून) सकाळी ९:३० वाजता त्यांनी दुकान सुरू केले. दिवसभर गिऱ्हाईकांची ये-जा सुरू असताना सायंकाळी ८ वाजता ते गाळा क्रमांक २ मधील गोडावूनमध्ये गेले असता त्यांना एक बियाण्याचा बॉक्स कम तरतेत आढळला. यानंतर तिपुळे यांनी तातडीने दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सायंकाळी ७:०३ वाजता एक २०-२१ वर्षांचा युवक दुकानातून बियाण्याचा बॉक्स घेऊन जाताना स्पष्टपणे दिसत आहे. हा इसम येलोरा कंपनीचे ३० नग पिशव्या असलेले अर्धा किलो वजनाचे, ३७ हजार ५०० रूपये किंमतीचे बियाण्याचे सीलबंद बॉक्स चोरून नेतोय, हे निदर्शनास आल्यानंतर तिपुळे यांनी वडिलांना व शेजारील दुकानदारांना माहिती दिली. यानंतर कोतवाली पोलिसांना माहिती देऊन फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# भाविकांसाठी कोपरगाव बस आगार सज्ज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : यंदा आषाढी एकादशीनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत कोपरगाव तालुक्यासह पंचक्रोशीतील भाविकांची मांदियाळी श्री क्षेत्र पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होणाऱ्या वारकऱ्यांसाठी कोपरगाव आगाराचे व्यवस्थापक अमोल बनकर यांनी अहिल्यानगर विभागाचे विभागीय वाहतूक अधिकारी चंद्रकांत चौधरी यांच्या आदेशानुसार वारकऱ्यांसाठी कोपरगाव येथून जादा बस सोडण्यासाठी नियोजन केले आहे.

सध्या कोपरगाव बस स्थानकातून पंढरपूरसाठी सकाळी ९ वाजता व सायंकाळी ७ वाजता बस मार्गस्थ होत असते. भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी कोपरगाव बस आगारातील सर्व अधिकारी व चालक वाहक सज्ज झाले आहे. यंदा पंढरपुरात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आगार व्यवस्थापक बनकर यांनी कोपरगाव येथून जाणाऱ्या गाड्यांचे नियोजन केले आहे. तसेच कोपरगाव वरून पंढरपूरकडे जाणाऱ्या सर्वसामान्य भाविकांसाठी तिकीट दर हा ५१४ रुपये असून महिलांना ५० टक्के सवलत अर्थात २५७ रुपये असणार आहे. तसेच ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा तर ६५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांसाठी ५० टक्के सवलत, अपंगांसाठी वन फोर सुविधा देण्यात आली आहे.



एखाद्या गावातून ४४ लोकांचा ग्रुप तयार असेल त्याप्रमाणे त्यांनी बुकिंग केल्यास त्या गावातून बस सोडण्याची देखील व्यवस्था करून दर्शन झाल्यावर पंढरपूर येथून पुन्हा त्याच गावी सोडण्याची व्यवस्था देखील केली जाईल सदरची बस ही कोपरगाव- शिर्डी- अहिल्यानगर- करमाळा- पंढरपूर येथे जाऊन पंढरपूर मध्ये विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील पार्किंग मध्ये शेवटचा स्टॉप असणार आहे.

# दीड लाखांचा बेकायदा हिरडा पकडला

## राजूरचे ३ जण मुद्देमालासह ओतूर वनविभागाच्या ताब्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोल्यातून विनापरवाना १ लाख ५२ हजार रुपायांच्या हिरड्याची वाहतूक करणाऱ्या टेम्पोसह तिघांना वनविभागाच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.

मयुर लहानु मुतडक (वय ३३), गोरख गणपत लहामगे (वय ४६ ), किरण सुभाष वराडे (वय ४६, सर्व राहणार राजुर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) या तिघांविरुद्ध भारतीय वन अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.



अकोले - जुन्नर सरहद्दीवर ओतुर शिवारात हिरडा मालाची विनापरवाना अवैध वाहतुक करणारा पिकअप क्र. एम एच २६ एच ९१९३ हा पिकअप टेम्पो ब्राम्हणवाडा रोड येथुन जात असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने जुन्नर उपवनसंरक्षक अमोल सातपुते (भा. व. से.), सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, अमृत शिंदे यांचे मार्गदर्शना खाली ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी एल. व्हि. ठोकळ, वन कर्मचाऱ्यांनी ओतूर - ब्राह्मणवाडा रोडवर सापळा लावून तपासणी केली असता सदर टेम्पोत अवैधरित्या हिरडा भरलेला आढळून आलाया हिरड्यांचे एकूण वजन १६८८ किलो भरले आहे.तर आजच्या बाजारभावाप्रमाणे त्या हिरड्याची किंमत १ लाख ५२ हजार इतकी असून वाहतूक करणारे ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच याबाबत तपास ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ हे करीत आहेत.

अकोल्यातील आदिवासी भागातील हिराड्याचा खाजगी व्यक्ती राजरोसपणे तस्करी करत आहे. अकोल्यातील वनविभाग मात्र डोळ्यावर पट्टी बांधून याला आशीर्वाद देत असल्याचे आता पुढे आले आहे. हिराड्याची विनापरवाना वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करताना दिसत नाही. खुलेआम हिरडा तस्करीला वनविभागाचा आशीर्वाद असल्याचा आरोप केला जातं आहे.

## धानोरेच्या श्रुतिका दिघेची नीटमध्ये उत्तुंग भरारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील धानोरे येथील रहिवासी व संत महिपती विद्यालय तांभेरे येथील ज्येष्ठ शिक्षक तसेच प्रेरणा पतसंस्थेचे संचालक नंदकुमार लक्ष्मण दिघे यांची कन्या श्रुतिका नंदकुमार दिघे हिने नीट परीक्षेत ५७३ गुण मिळवत ऑल इंडिया रँकमध्ये ओबीसी श्रेणीत १८५६ वा क्रमांक पटकावला.

श्रुतिकाचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिघे वस्ती, धानोरे येथे झाले आहे. माध्यमिक शिक्षण लोणी येथील रयत शिक्षण संस्थेमध्ये झाले आहे, तर बारावीचे शिक्षणराजश्री शाहू कॉलेज लातूर येथे पार पडले आहे. आठवीच्या शिष्यवृत्ती पररीक्षत तिने राज्यात आठवा क्रमांक मिळवला होता. तिची निवड रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागात आदर्श विद्यार्थीनी म्हणून झाली होती. तिच्या या यशाबद्दल धानोरे गाव, राहुरी तालुका तसेच सर्वत्र कौतुक होत आहे. प्रेरणा अर्थसमुहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांची ती नात आहे.

# आजचे विद्यार्थी देशाचे भविष्य : राज्यपाल सी पी राधाकृष्णन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : आजचे विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळाल्यास ते सर्व विद्यार्थी उत्तम माणूस म्हणून घडतील व त्यांचे आयुष्य उज्ज्वल राहिल, असे गौरवोद्गार राज्याचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काढले .

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या वरळी सी फेस शाळेत राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचे हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांना विविध शालोपयोगी वस्तुंचे वितरण राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वांना संबोधित करताना त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचे कौतुक करत असताना, आजचे विद्यार्थी हे देशाचे उद्याचे भविष्य असुन त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळाल्यास सर्व विद्यार्थी उत्तम माणुस म्हणून घडतील आणि त्यांचे आयुष्य उज्ज्वल होईल. या वेळी स्वतः राज्यपालांनी विद्यार्थ्यांमध्ये जाऊन खाऊ वाटप देखील केले.

यावेळी बृहन्मुंबई महानगर पालिका आयुक्त तथा प्रशासक भुषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ. अमित सैनी, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे उपसचिव डी. रामास्वामी , मनपा उपायुक्त शिक्षण डॉ. प्राची जांभेकर , शिक्षण उपसंचालक तथा मनपा शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनपा प्रशासकीय अधिकारी किसनराव पावडे पाटील यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत कोणताही कार्यक्रम असो, अगदी राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री, महापौर वा इतर मान्यवरांसाठी आयोजीत केला. तर सर्वांत प्रथम जबाबदारी येते. ती हजरजबाबी, मितभाषी, अष्टपैल व्यक्ती महत्त्व असलेले पारनेर तालुक्यातील दरोडी येथील भूमीपुत्र व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासकिय अधिकारी किसनराव पावडे पाटील यांच्यावर अतिशय नियोजन बद्द व उत्कृष्ठ रित्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतात. जेणेकरून कार्यक्रमाला आलेले पाहुणे आनंदी व समाधानी होतात.



# पोलिसांकडून अवैध गावठी दारू विक्रीवर छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड** : खर्डा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी खर्डा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर लगेच खर्डा हद्दीतील अवैध धंद्यावर स्वतः जावून कारवाई करून अमोल वतारे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

खर्डा हद्दीतील गावठी हातभट्टीचे ठिकाणे उदध्वस्त करून त्याच्यावर कारवाई केली असून पुढील तपास पोहेकॉ संभाजी शेंडे हे करत आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५ विनापरवाना दारू बाळगणे व विक्री करणे हे गुन्हे असून त्यासंदर्भात शिक्षा व दंडाची तरतूद आहे. अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी केलेली कारवाई महत्त्वाची असून अवैध दारू विक्री करत कोणी असेल तर नागरिकांनी त्वरित स्थानिक पोलिसांना माहिती द्यावी, असे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी सांगितले.

# अवैद्य दारु विक्री करणाऱ्या हॉटेलवर छापा

## सव्वा लाख रुपयांचा ऐवज पोलिसांकडून जप्त; तीन आरोपींना अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड परिसरातील देशी-विदेशी अवैध दारू बाळगणाऱ्या हॉटेलवर अहिल्यानगर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या विशेष पथकाने छापा टाकत १ लाख २० हजार ४६५ रूपयांच्या अवैध दारू वर कारवाई करत तीन आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे. यामुळे अवैध धंदे वाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पोलीसांचे विशेष पथक तयार करून सदर पथकास जिल्ह्यातील अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार परिविक्षाधिन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या विशेष पथकाने बुधवार दि. १८ रोजी गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार जामखेड येथील नगर रोडवरील हॉटेल पाटील वाडा, खर्डा रोडवरील हॉटेल साई लॉँजिंग येथे हॉटेल मालक हे अवैध रित्या विनापरवाना देशी-विदेशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून केली आहे अशी खात्री लायक माहिती मिळाली.



यानुसार सदरचे पथक हॉटेल पाटील वाडा येथे छापा टाकत २६९१० रुपयांचा देशी विदेशी दारूचा साठा यात बिअर, व्हिस्की, रम असा माल व १५२७० रूपये रोख रक्कम असा एकुण ४२ हजार १८० रूपयांचा मुद्देमाल ताब्यात घेऊन हॉटेल मालक आरोपी किसन सुरेश जरे यास ताब्यात घेतले.

यानंतर याच पथकाने जामखेड येथील खर्डा रोडवरील हॉटेल साई लॉँजिंग येथे छापा टाकत येथे विविध प्रकारच्या देशी विदेशी बिअर, व्हिस्की, रम असा एकुण ७८ हजार २८५ रूपयांचा अवैध माल ताब्यात घेऊन जप्त केला. पोलिसांनी आरोपी हॉटेल मालक सचिन विक्रम तनपुरे व सतिश नवनाथ पवार दोन्ही शिऊर व जामखेड याना ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी नेमलेल्या आहिल्यानगरच्या विशेष पथकातील परिवीक्षाधिन पोलीस उप अधिक्षक संतोष खाडे, पोसई राजेंद्र वाघ, शंकर चौधरी, दिनेश मोरे, उमेश खेडकर, सुनील पवार, अजय साठे आदींनी केली आहे.

# पाथर्डीतील हतराळ शिवारातून ट्रॉली चोरीला

## ट्रॉलीवर विषाल टेलर्स लिहीले; फिर्यादीकडून एकावर संशय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यातील हतराळ शिवारातून एका शेतकरी कामगाराची सुमारे ७० हजार रुपये किमतीची ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



या प्रकरणी शहादेव ज्ञानदेव केदार (वय ५५, रा. हतराळ) यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीने गावातील एक इसम आकाश गंगाधर बुधवंत (रा. सैदापुर) याच्यावर संशय व्यक्त केला आहे. फिर्यादी शहादेव केदार हे ऊसतोड कामगार असून, स्वराज कंपनीचे ट्रॅक्टर करारावर चालवतात.

दि. २२ मे रोजी दुपारी १२ वाजता त्यांनी भाऊसाहेब कराड यांच्या शेतामध्ये सिमेंट, लोखंड व खडी भरलेली ट्रॉली सोडली होती. त्यानंतर त्यांच्या आईस अ‍ॅटॅक आल्याने ते तिला उपचारासाठी निघून गेले. डिस्चार्जनंतर ५ जून रोजी घरी परतल्यानंतर त्यांनी ट्रॉलीसाठी शेतात गेल्यावर ट्रॉली तिथे न मिळाल्याचे लक्षात आले.

परिसरात शोध घेऊनही ट्रॉली मिळाली नाही.सदर ट्रॉली ही निळ्या रंगाची, चार चाकी असून दोन्ही बाजूंना विषाल टेलर्स असे लिहिलेले होते. अंदाजे किंमत ७० हजार इतकी असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शिक्षणाबरोबरच संस्कृती व संस्कारही महत्त्वाचे : कोतकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत आलेल्या मुलींचे स्वागत करुन प्रविष्ठ झाल्या. शाळेत आलेल्या नवोदित मुलींचे पाठयपुस्तके तसेच शालेय उपयोगी साहित्य देऊन अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.

राजर्षी शाहू संस्थेचे सचिव बबन कोतकर म्हणाले की, विद्यार्थिनीच्या शालेय दशेत योग्य मार्गदर्शनाची गरज असते. ते काम शिक्षक वृंद करत असतात. त्या माध्यमातून मुलींना उच्च शिक्षित होवून भरारी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

> विद्यालयामध्ये सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थिनी शिक्षण घेत असून, त्यांना चांगल्या दर्जेचे शिक्षण दिले जात आहे. शिक्षणाबरोबरच आपली संस्कृती व संस्कार तितकेच महत्त्वाचे आहे.
> **– बबन कोतकर, सचिव**

इयत्ता ५ ते ९ वी मधील सर्व विद्यार्थिनी विद्यालयात चांगल्या विद्यार्थिनी घडवल्या जातात, सक्षम झालेल्या मुली भारताचे उज्वल भविष्य आहे.



याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनभारती गुंड यांनी केले. आभार छाया सुंबे यांनी मानले. यावेळी संस्थेचे सहसचिव रावसाहेब सातपुते, खजिनदार प्रल्हाद साठे, संचालक दगडू साळवे, जयश्री कोतकर आदी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

# आंबीतनंतर पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : मुळानदी पाणलोट क्षेत्रात मान्सून सक्रिय झाल्याने अकोले तालुक्यातील आंबीत धरणानंतर मुळा नदीवरील पिंपळगाव खांड धरण काल पहाटे भरले आहे. पहाटे ५.३० वाजता पिंपळगाव खांड धरण ओव्हर फ्लो होऊन मुळा नदीचा पाण्याचा प्रवाह मुळा धरणाच्या दिशेने झेपावले आहे.

मुळा नदी पाणलोट क्षेत्रात मंगळवारपासून पावसाची जोरदार बॅटिंग सुरु झाली. बुधवारी रात्रभर सुरु असलेल्या संतत धार पावसाने मुळा नदीची आवक वाढली. यामुळे ६०० दल घ फ क्षमतेचे पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो झाले. मुळा नदीच्या उगमावर आंबीत येथे असणारे १९३ दशलक्ष घनफूट क्षमतेचे आंबीत धरण २७ मे २०२५रोजी दुपारी १ वाजता ओव्हरफ्लो झाले. जिल्ह्यातील हे पहिले धरण भरले होते. त्यानंतर आता पिंपळगाव खांड हे दुसरे धरण भरले आहे.

मान्सूनच्या दमदार बॅटिंगमुळे अकोले तालुक्यातील सह्याद्रीच्या डोंगर रांगा आता ओल्या चिंब झाल्या आहे. ओढे नाले सक्रिय झाल्याने मुळा नदीचा प्रवाह वाढला. पिंपळगाव खांड धरणात मोठी आवक झाली. आजही पावसाचे सातत्य टिकून आहे.



२१३७६ क्यूसेस पाण्याचा विसर्ग मुळा धरणाकडे झेपावला आहे. मुळा नदीवर असणाऱ्या राहुरी तालुक्यातील २६ टीएमसी क्षमतेच्या मुळा धरणात आता आवक सुरू होणार आहे.

अकोले तालुक्यातील आंबित धरणानंतर आता पिंपळगाव खांड भरले. यंदाच्या पावसाळ्यात अकोले तालुक्यातील हे दुसरे धरण भरले आहे. मुळा नदी वाहती झाल्याने संगमनेर-अकोले तालुक्यातील मुळा परिसरात आनंद व्यक्त होत आहे.

# आ. पवारांच्या खाजगी सहायकांना मारहाण करण्यात आलेली नाही : घुले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : आ. रोहित पवार यांच्या खाजगी सहाय्यकांना नगरपंचायतमध्ये कोणत्याही प्रकारची मारहाण झालेली नाही. हा केवळ नगरपंचायत मधील सत्ता गेल्यामुळे केलेला बनाव आहे, अशी टीका नगराध्यक्षा रोहिणी घुले यांचे पती सचिन घुले यांनी कर्जत येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केली आहे. यावेळी भाऊसाहेब तोरडमल, भास्कर भैलुमे, सुनील शेलार, सचिन कुलथे, विनोद दळवी, माजिद पठाण, भूषण खरात, अमोल भगत आदी उपस्थित होते.



सचिन घुले म्हणाले की, कर्जत नगरपंचायतमध्ये आ. पवार यांची सत्ता आम्ही उलथवून टाकली. त्यांची राज्यभर यामुळे नाचक्की झाली. आ. पवार यांना तीन वर्षे देखील नगरसेवक सांभाळता आले नाही. नगरसेवकांनी अनेक वेळा त्यांना अडचणी सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. याचा राग मनाम ध्ये धरून त्यांनी या घटनेची एक स्क्रिप्ट तयार करून दिली आणि ती तशीच्या तशी वाचून दाखवण्यात आली आहे.

कोणाला मारहाण करणे ही आमची प्रवृत्ती नाही. तसेच आम्ही लोकही नाहीत त्यांचे अपयश झाकण्यासाठी अशा पद्धतीने खोटे आरोप आमच्यावर करण्यात आले आहे.

घुले यांनी नामदेव राऊत यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका करताना आ. पवार यांनी राऊत यांना अक्षरशा ठेचून भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये घेतले याचा त्यांना विसर पडला आहे. रोहित शर्मा यांच्या कार्यक्रमांम ध्ये पवार यांच्या खाजगी स्वीय सहाय्यकाला दहा ते पंधरा हजार नागरिकांच्या उपस्थितीमध्ये मारहाण करण्यात आली होती.

यावेळी हेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कुठे गेले होते? असा प्रश्न घुले यांनी उपस्थित केला आहे. ओबीसी समाजाचे नेतृत्व करणारे नेते मानता व नगरपंचायतमधील लेखापाल महिलेचे प्रकरण तालुक्यातील जनता अद्याप विसरलेली नाही यामुळे महिलांविषयी यांची संस्कृती काय आहे हे सर्व जनतेला माहित आहे, असे सचिन घुले म्हणाले.

# पै. डोंगरे व्यायाम शाळेला अधिकृत मान्यता

## नाना डोंगरे यांचा पुढाकार; राष्ट्रीय पातळीवरील कुस्तीपटू घडविण्याचा निर्धार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे पै. नाना डोंगरे व्यायाम शाळेला नुकतीच सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्याकडून अधिकृत मान्यता प्राप्त झाली असून, गावात लवकरच अद्ययावत कुस्ती संकुल साकारले जाणार आहे. या व्यायाम शाळेतून ग्रामीण भागातील नवोदित कुस्तीपटूंना कुस्तीचे धडे व मार्गदर्शन मिळणार आहे.



या संकुलात पारंपरिक मातीचा आखाडा तसेच आधुनिक मॅटचा समावेश असणार आहे. यामुळे पारंपरिक व आधुनिक दोन्ही पद्धतींचा समन्वय साधत प्रशिक्षण दिले जाणार आहे. कुस्तीमध्ये रुची असलेल्या गरजू व होतकरू मुले-मुलींना या संकुलात प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पै. नाना डोंगरे व्यायाम शाळेच्या माध्यमातून तज्ज्ञ कुस्ती प्रशिक्षकांकडून विद्यार्थी स्पर्धेसाठी तयार केले जाणार आहेत. शारीरिक ताकद, तंत्र, आणि आत्मविश्वास यांची संगती साधत खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा मानस डोंगरे यांनी व्यक्त केला आहे.

# प्रवराच्या सिव्हिल अभियांत्रिकीची उत्कृष्ट कामगिरी

## शंभर टक्के विद्यार्थ्यांना विविध नामांकित नोकरी; दिग्गज मान्यवरांकडून कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा रूरल अभियांत्रिकी महाविद्यालय येथील सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी २०२५ च्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये उत्तम यश संपादन केले असून १०० टक्के विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली, अशी माहिती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

सिव्हील विभागाच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्लेंसमेंटचे प्रमुख प्रा. मनोज परजणे यांनी अभिनंदन केले आहे.

> प्रवरा रूरल अभियांत्रिकी महाविद्यालयामधील माझा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आणि घडवणारा ठरला. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांचे मिळणारे पाठबळ प्रेरणा माझ्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले. सिव्हिल अभियांत्रिकी विभागामध्ये मला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर प्रत्यक्ष क्षेत्रातील कौशल्य, सॉफ्टवेअर ट्रेनिंग, इंडस्ट्री एक्स्पोजर आणि करिअर गाइडन्स मिळाले. सोपान ओ अँड एम कंपनीसारख्या नामांकित कंपनीमध्ये निवड होणे ही माझ्यासाठी एक मोठी संधी आहे.

> मी हे यश माझ्या शिक्षक, पालक आणि संपूर्ण कॉलेज व्यवस्थापनाला अर्पण करतो. भविष्यातही मी मेहनत करत राहीन आणि संस्थेचे नाव उज्वल करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार आहे.
> **– नोमान पटेल**

या निवडीमुळे विभागाच्या दर्जेदार शिक्षणपद्धतीसह प्लेसमेंटबाबत केलेल्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे. इंडोव्हान्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, सोपान ओ अँड एम कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, के रहेजा कॉर्प, पुणे, केआरएम कन्स्ट्रक्शन, अहिल्यानगर, लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, कोल्हापूर, ड्रिव्हन स्टील इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक, स्पेक्ट्रम इन्फ्रास्ट्रक्चर, नाशिक, एस. आर. प्रोजेक्ट्स, पुणे, बजाज फायनान्स, श्रीरामपूर.



या सर्व कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना बांधकाम व्यवस्थापन, प्रकल्प योजना, रचनातंत्र, डिजाईन, फील्ड सुपरविजन आणि शासकीय क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. तसेच या प्लेसमेंट मध्ये नोमान पटेल यांची सोपान ओ अँड एम कंपनी, पुणे तर रितेश गवळी यांची इंडोव्हान्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथे ४ लाख वार्षिक पगारासह निवड झाली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. प्रमोद कोळसे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ. अण्णासाहेब वराडे, प्रा. लक्ष्मण लहामगे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. संजय गुल्हाणे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश आमच्या संस्थेच्या शिक्षण मूल्यांनुसार आहे. आम्ही केवळ शैक्षणिक विकासावर नव्हे तर औद्योगिक क्षमतांवरही भर देतो.

# गोरक्षनाथ गडावरून दिंडीचे आयोजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : येथून जवळच असणाऱ्या मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून सालाबादप्रमाणे दिनांक २५ जून रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाडी दिंडी सोहळा प्रस्थान करणार असून दिंडीचे हे ४०वे वर्ष आहे. वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली व राम महाराज पोते, वै. गोरक्षनाथ महाराज ढोकणे, भाऊसाहेब महाराज हरिचंद्रे व दिंडी सोहळा ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली गर्भगिरी डोंगर रांगेतील नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गड येथून २५ जून रोजी सकाळी ११ वाजता निघणार आहे. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दिंडी सोहळा गोरक्षनाथ गडावरून निघाल्यावर पहिला मुक्काम पिंपळगाव माळवी येथे राहणार असून दुसरा मुक्काम २६ जूनला नगर मधील सावेडीतील सहकारनगर मध्ये राहणार असून तेथील व्यवस्था माऊली कृपा मित्र मंडळ यांनी केली आहे. दि. २७ जून ला दिंडी सोहळा समतानगर येथे डॉ. प्रकाश जाधव यांचे येथे सकाळचा नाश्ता घेणार असून रात्रीचा मुक्काम नगर तालुक्यातील दहिगाव येथे राहणार आहे तर दिनांक ३० जून रोजी चापडगाव येथे घोड्याचे रिंगण होणार आहे. पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोचणार आहे.द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे.

# तालुका पोलीस ठाण्याची इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

## ब्रिटिशकालीन जुन्या इमारतीतच कामकाज सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव तालुका पोलिस ठाण्याची इमारत बांधून पूर्ण झालेली आहे. परंतु ही गेल्या अनेक महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. तालुका पोलीस स्टेशन हे नगरपरिषदेच्या ब्रिटिश काळातील इमारतीमध्ये अर्थात जुन्या सरकारी दवाखान्याच्या प्रसुतीगृहात सध्या कोपरगाव तालुका पोलिसांचे कामकाज सुरू आहे. मात्र ही इमारत अत्यंत जुनी झाली असून ती पूर्णपणे मोडकळीस आली आहे. पावसाळ्यामध्ये संपूर्ण इमारत गळत असते. तसेच इमारतीच्या समोरच्या पोर्चमध्ये वरील स्लॅबचे प्लास्टर वारंवार पडत असून स्लॅबच्या आतील गज डोळ्याने स्पष्ट दिसत आहे. या इमारतीमध्ये कामकाज



करतांना पोलीस कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. या तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत ५५ गावे येत असून या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लोकसंख्या ही २०११ च्या जनगणने नुसार २ लाख ५८ हजार १६ असून या पोलीस ठाण्याचे भौगोलिक क्षेत्र हे मोठे असल्याने पश्चिमेला नाशिक व पूर्वेला छत्रपती संभाजीनगर यांच्या हद्दीपर्यंत तालुका पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र येते.

एवढे मोठे कार्यक्षेत्र असून कायदा सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी या पोलिसांवर असतांना त्यांना व्यवस्थित बसण्यासाठी किंवा सरकारी दप्तर ठेवण्यासाठी जागा नसल्याने अशा अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. कोपरगाव तालुक्याची लोकसंख्या विचारात घेता या इमारतीमध्ये दिनांक २८ जानेवारी १९१५ पासून कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनची निर्मिती झाली. तेव्हा त्या पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून स. पो. नि. प्रकाश. पाटील यांनी पदभार स्वीकारला होता. तेव्हा पासून तालुका पोलीस ठाण्याचे कामकाज या जुन्या सरकारी दवाखान्याच्या प्रस्तुती गृहांमध्ये सुरू आहे. कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याच्या इमारतीसाठी प्रदीर्घ काळ अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याची इमारत उपलब्ध व्हावी, यासाठी स्थानिक आमदार जिल्हा पोलीस अधीक्षकांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सातत्याने पाठपुरावा करत होते. अखेर दोन वर्षांपूर्वी असे ठरले की, कोपरगाव शहर पोलीस स्टेशनच्या बाजूला असलेल्या जागेत म्हणजे पूर्वीचे ब्रिटिशकालीन पोलीस स्टेशन होते.

कोपरगाव तालुका पोलिस ठाणे बांधण्याची सर्वानुमते ठरले व त्यानंतर सदरच्या जागेचा ताबा घेण्यासाठी स्थानिक आमदारांना निधी मिळवण्यासाठी प्रदीर्घकाळ मंत्रालय स्तरावर व वरिष्ठांकडे पाठपुरावा करावा लागला. त्यानंतर इमारत बांधण्यासाठी निधी मंजूर झाला. त्याचे टेंडर निघाले व त्यानंतर इमारतीचे काम सुरू झाले. शेवटच्या टप्प्यात येऊन पोहोचले. संपूर्ण इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन अंतर्गत सजावट रंगरंगोटीचे काम देखील पूर्ण झाले आहे. मात्र या इमारतीचा ताबा कोपरगाव तालुका पोलिसांना कधी मिळणार? असा सवाल व्यक्त होत आहे.

# वासुंदेच्या उपसरपंचपदी बाळासाहेब शिंदे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेरतालुक्यातील महत्वपूर्ण ग्रामपंचायत असलेल्या वासुंदे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बाळासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपसरपंच शंकर बर्वे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर शिंदे यांची निवड करण्यात आली. या निवडीमुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडीनंतर वासुंदे येथे आयोजित कार्यक्रमात नवनिर्वाचित उपसरपंच बाळासाहेब शिंदे यांचा गावच्या



वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सरपंच विमल झावरे, माजी सरपंच सुमन सैद, माजी उपसरपंच शंकर बर्वे, सूर्यभान भालेकर, वासुंदे सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, रामदास झावरे, विलास साठे, बापूसाहेब गायखे, भाऊ सैद, युवा नेते स्वप्निल झावरे, इंजि. निखिल दाते, अमोल साठे, पहिलवान गणेश शिरतार, किरण पोपळघट, अभियंता प्रसाद झावरे, दिलीप पाटोळे, अमोल शिंदे, सुरेश शिंदे, दत्तात्रय गांगड, राजेंद्र शिंदे, गजानन जगदाळे, प्रणेश शिरतार, संतोष दाते, अमोल पोटघन, राजेश साठे, भाऊसाहेब जगदाळे, प्रल्हाद भालेकर, सुदाम शिर्के, सुभाष शिंदे, पोपट बर्वे, मच्छिंद्र झावरे, पोपट ठुबे, जनाबाई केदार, शांताराम साठे, बाळासाहेब झावरे, लक्ष्मण झावरे आणि इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक भास्कर लोंढे यांनी काम पाहिले. सन्मान समारंभात सुजित झावरे पाटील यांनी बाळासाहेब शिंदे यांचे अभिनंदन करत गावाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. सरपंच विमल झावरे यांनीही शिंदे यांना शुभेच्छा देत गावाच्या प्रगतीसाठी सहकार्याचे आश्वासन दिले.

# पाथर्डीतून अनेक दिंड्या आळंदीकडे रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील अनेक दिंड्या आळंदीकडे रवाना होऊन संपूर्ण नगर पाथर्डी रस्ता आषाढीमय होऊन नगर पर्यंत दुपारनंतर अधून मधून वाहतूक कोंडी होत होती. राष्ट्रसंत तनपुरे महाराजांचे गाव करंजी पासून दोन किलोमीटर दगडवाडी असून त्यांच्यामुळे हा संपूर्ण परिसर वारकरी संप्रदायाच्या प्रभावाखाली आहे. त्यामुळे गावातील भाविक वारकऱ्यांच्या सेवेत सतत पुढे असतात. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान



ठेवणार असून त्यामध्ये सहभागी होण्यासाठी मराठवाड्यासह तालुक्यातील काही वारकरी दिंड्या पताका घेऊन विठूचा व ज्ञानोबा तुकोबाचा गजर करत उत्साहाने निघाल्या आहेत. जालना, अंबड, गेवराई माजलगाव, बीड या भागातील सुमारे दीडशे दिंड्या दरवर्षी माऊलींच्या मुख्य सोहळ्यामध्ये आळंदीहून पंढरपूर पर्यंत सहभागी होतात. वर्षानुवर्षांची ही परंपरा त्या गावातील वारकऱ्यांनी अत्यंत भक्ती भावाने जोपासली आहे. मराठवाड्यामध्ये यंदा पेरणी योग्य पाऊस झाल्याने पेरण्या उरकून शेतकरी वारकरी बहुसंख्येने आळंदीकडे निघाले आहेत.

# सय्यद यांच्याकडून टाकळी शाळेस अनोखी भेट



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोले येथील सामाजिक कार्यकर्ते समीर सय्यद यांनी शाळा प्रवेशोत्सव दिनाचे औचित्य साधून टाकळी जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या व लेखन साहित्याचे वाटप केले. या दातृत्वशील स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. समीर सय्यद व त्यांचा मित्र परिवार नेहमीच सामाजिक व शैक्षणिक सेवाभावी उपक्रमांमध्ये योगदान देत असतो. संवेदनशीलता जपून सय्यद परिवाराने राबविलेल्या नवोपक्रमासाठी अकोले तालुका गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, देवठाण बीट शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, टाकळी केंद्र प्रमुख रोहिणी खतोडे, केंद्र मुख्याध्यापक डॉ. श्रीनिवास पोतदार, सहशिक्षिक संजय देशमुख, दत्तात्रय देवगिरे, संजय शिंदे, निता लेंभे यांनी सय्यद परिवाराचे अभिनंदन केले आहे.

# सीईटी परीक्षेत संजीवनीचे यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मार्फत एप्रिल २०२५ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये (एमएचटी साईटी) संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस संचलित संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या आदित्य रविंद्र सिनगरने मुलांमध्ये ९८. ८१ पर्सेंटाईल मिळविले तर मुलींमध्ये अश्विनी गोरखनाथ म्हस्के हीने ९५. ०४ पर्सेंटाईल मिळवुन आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्षन घडविले. यात संजीवनीच्या १९ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक तर ८० ते ८९ पर्सेटाईलमध्ये ३८ विद्यार्थी उत्तिर्ण झाले, अशा प्रकारे संजीवनी ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक कामगिरी करून संजीवनीच्या षिरपेचाम मानाचा तुरा खोवला आहे, अशी माहिती संजीवनी ज्यु. कॉलेजच्या वतीने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व अमित कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्रीरामपुरात डिग्री इंजिनिअरींग कॉलेज सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च व उत्तम दर्जाचे तांत्रिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हावी, यादृष्टीने अशोक शिक्षण संस्थेने आणखी ऐतिहासिक पाऊल उचलले असून श्रीरामपूर तालुक्यातील पहिले डिग्री इंजिनिअरिंग कॉलेज नव्याने सुरु करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे यांनी प्रसिध्दी पत्रकात दिली आहे.

अशोक कारखान्याचे चेअरमन माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोक सहकारी साखर कारखाना संलग्न अशोक शिक्षण संस्थेअंतर्गत पॉलिटेक्निक, डी. व बी. फार्मसी, आयटीआय, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंग्लिश मिडीयम स्कूल, सीबीएसई स्कूल सुरु आहे. त्यात नव्यानेच डिग्री इंजिनीअरिंग कॉलेज सुरु करण्यात आलेले आहे.

मुरकुटे यांनी माहिती देताना सांगितले की, श्रीरामपूर तालुक्यात पहिले डिग्री इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याचा मान अशोक शैक्षणिक संकुलास मिळाला असून संस्थेसाठी भूषणावह आहे.

या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांची संलग्नता मिळाली आहे.

डिग्रीसाठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना १२ वी विज्ञान शाखेत चांगले गुण मिळवून महाराष्ट्र शासनामार्फत घेण्यात येणारी – परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. यासोबतच परीक्षेतील गुणांच्या आधारावर इंजिनीअरिंग प्रवेश मिळविणे शक्य आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनीअरिंग या तीन अभ्यासक्रमांना पहिल्या वर्षी प्रवेश मिळवता येईल.

# सैनिक सन्मान पंधरवडा नियोजन बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर येथील महसूल विभागाच्या वतीने १६ ते ३० जून सैनिक पंधरवाडा कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याने तहसीलदार मिलींद वाघ यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय श्रीराम पूर याठिकाणी बैठक संपन्न झाली. बैठकीत माजी सैनिकांनी रस्ता केस, आजी सैनिकांच्या घरी झालेली २१ तोळे सोन्याची धाडसी चोरी होऊन चार महिने झाले तरीही त्याचा तपास नाही. तपास करून सेवारत सैनिकास न्याय मिळावा, फेर रद्द करणेबाबत, लेखी तक्रार, सैनिक कॉलनी मधील प्लॉट शासनाच्या वतीने माजी सैनिकांना सन १९८०



या काळात दिले आहेत. परंतु ज्या माजी सैनिकांनी अटी शर्तीचा भंग करून परस्पर ९९ वर्षाच्या करारावर काही प्लॉट सिव्हिल लोकांना विक्री केले आहेत. लोक तेथे असलेल्या माजी सैनिकांना नाहक त्रास देत आहेत. त्याची शासन स्तरावरून योग्य प्रकारे चौकशी करून गरजु माजी सैनिकांना फेरवाटप करण्यात यावे, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. बैठकीस मेजर कृष्णा सरदार, राजेंद्र कांदे,श्रीमती छाया मोटे, बाळासाहेब बनकर, बाळासाहेब उंडे, वीर पिता विष्णू बडाख, वीरमाता इंदूबाई बडाख,मिनानाथ गुलदगड, संजय बनकर, शरद तांबे, मच्छिंद्र शेळके इत्यादी माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्राकडून क्षयरोग दुरीकरण उपक्रमांचे कौतुक

## महानगरपालिकेच्या दवाखान्यातील सुविधांची पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम ाचा अभ्यास करण्यासाठी अहिल्यानगर शहराच्या दौऱ्यावर आलेले पंतप्रधान कार्यालयाचे उपसचिव डॉ. विपिन कुमार यांनी महानगर पालिकेच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाला भेट देऊन तेथील उपलब्ध सुविधा व सेवांची माहिती घेतली. महानगर पालिकेमार्फत आयोजित निक्षय शिबिरासही त्यांनी भेट देऊन क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत महानगर पालिकेने राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले.

डॉ. विपिन कुमार यांनी सुरुवातीला जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, संचालक डॉ. संदिप सांगळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापुसाहेब नागरगोजे यावेळी उपस्थित होते.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी डॉ. विपिन कुमार यांना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली. जागतिक क्षय रोग दिनानिमित्त करण्यात आलेली जनजागृती व शिबिरांची माहिती देण्यात आली. आरोग्य विषयक उपक्रमांमध्ये झालेल्या सुधारणा व चांगल्या कार्यामुळे राज्य शासनाच्या रँकिंगमध्ये केलेली यशस्वी कामगिरी, आरोग्यवर्धिनी केंद्रांची उभारणी, स्टाफ नर्स, आशा कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी होणारे सर्वेक्षण आदींची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी डॉ. विपिन कुमार यांना दिली.

**CHANGE IN NAME**

My old name was **MAHESH BHAGWANRAO SHAHANE.**
My new name is **MAHESH BHAGWAN SHAHANE.**
It will be used for all future purposes.
My Adhar No. **266345757633**

# थोरात क्रीडा संकुलात योग दिनाचे आयोजन

## डॉ. जयश्री थोरात; जयहिंद लोकचळवळच्या वतीने शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : धावपळीच्या जीवनात चांगल्या आरोग्यासाठी योगा हा अत्यंत महत्त्वाचा असून एकवीरा फाउंडेशन व सह्याद्री विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज तसेच जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २१ जून २०२५ रोजी सकाळी ७.३० वा. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे भव्य दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांनी दिली आहे. या संयुक्त योग दिनाच्या बाबत माहिती देताना युवक काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्य व सबलीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगा दिन असून या निमित्ताने शनिवार २१ जून २०२५ रोजी सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत भव्य योगा शिबिराचे आयोजन केले आहे. यामध्ये माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे हेही सहभागी होणार आहे. याचबरोबर सह्याद्री विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मधील सुमारे २००० विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी याचबरोबर संगमनेर शहर व तालुक्यातील महिला युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.


जयश्री थोरात म्हणाल्या की, प्रत्येक जण धावपळीमध्ये व्यस्त असतो आणि तो आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु आरोग्य हे सर्वात महत्त्वाचे असून प्रत्येकाने स्वतः च्या आरोग्यासाठी थोडावेळ काढला पाहिजे. योगातून काम करण्यासाठी प्रत्येकाला ऊर्जा आणि उत्साह मिळत असते. कुटुंबातील इतरांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या महिलांकरता या योग शिबिरातून नक्कीच उत्साह आणि ऊर्जा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# भंडारदरात पाऊस २१९ दलघफू पाण्याची आवक

## घाटघरला १२२ तर रतनवाडीत १०७ मिमी नोंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : उत्तर नगर जिल्ह्याच्या विकासात मोठा हातभार असणाऱ्या भंडारदरा धरण पाणलोटात सोमवारी रात्री जोरदार पाऊस झाल्याने काल मंगळवारी सायंकाळी संपलेल्या २४ तासांत २१९ दलघफू पाणी दाखल झाले. पाणलोटातील चेरापुंजी असलेल्या घाटघर ५ तर रतनवाडीत ४ इंच पावसाची नोंद झाली आहे. गत दोन दिवसांपासून पाणलोटात मान्सून पुन्हा सक्रिय झाल्याने अधून मधून पावसाच्या सरी कोसळत होत्या. डोंगरदऱ्या आणि रस्ते धुक्याने लेपाटून गेले आहे. वातावरणात गारवा निर्माण झाल्याने गारठा निर्माण झाल्याने धुण्याही पेटल्या आहेत. अशातच सोमवारी रात्री पावसाने जोर धरला. त्यामुळे डोंगरदऱ्यांमधील धबधबे जोमाने वाहु लागले. ओढेनालेही जोरदार वाहू लागले. परिणामी भंडारदराचे खपाटीला गेलेले पोट हळूहळू वाढु लागले आहे. काल सकाळी संपलेल्या २४ तासांत धरणात नव्याने २१८ दलघफू पाण्याची आवक झाली. ११०३९ क्षमतेच्या या धरणातील पाणीसाठा २३७० दलघफूवर पोहचला होता.



### निळवंडे धरणातही आवक सुरु

निळवंडेतही आवक सुरू असून २५८६ दलघफू पाणी होते. वाकी तलाव आणि दरम्यान, कोतूळ वार्ताहराने कळविले की, मुळा पाणलोटात पावसाचा फारसा जोर होत नसलातरी अधून मधून पडणाऱ्या सरींमुळे पिंपळगाव खांड धरणात पाण्याची आवक होत आहे.


# अस्मिता

## फळांचा राजा घेईल चेहऱ्याची काळजी!

अत्यंत गोड आणि रसाळ चवीच्या आंबा या फळामध्ये भरपूर प्रमाणात अ, क आणि इ जीवनसत्त्व असतात, ते आपल्या आरोग्यासह त्वचेसाठीही फार उपयुक्त असतात. या जीवनसत्वांमुळे त्वचेवरील बारीक रेषा, सुरकुत्या आणि वय दिसण्यासारख्या समस्या दूर करण्यास मदत होऊ शकते. त्वचा उजळ, चमकदार आणि तुकतुकीत ठेवण्यासाठी आंब्याचा वापर कसा करायचा ते पाहू या. तसेच आंब्याचा घरगुती फेसमास्क बनवून त्याचा वापर कसा करावा जाणून घ्या. इतकेच नाही तर आंब्यामध्ये अँटीऑक्सिडंट्सदेखील भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे सूर्याच्या अतिनील किरणांपासून, प्रदूषणापासून आपल्या त्वचेचे रक्षण करून, चेहरा तुकतुकीत ठेवण्याचे कामसुद्धा आंबा करतो. चेहरा उजळ, तुकतुकीत आणि तजेलदार ठेवायचा असल्यास आंब्यापासून घरच्याघरी फेसमास्क कसा बनवायचा पाहू या.

✽ **साहित्य:** १ पिकलेला आंबा, दही अथवा मध

✽ **कृती:** सर्वप्रथम आंबा पाण्याखाली स्वच्छ धुवून घ्या. सुरीच्या मदतीने आंब्याची सालं काढून घ्या. मात्र सालांबरोबर फळाचा फारसा गर येणार नाही याची काळजी घ्यावी. आता आंब्याच्या सालाचे बारीक तुकडे चिरून मिक्सरमध्ये घाला. यामध्ये तुम्हाला हवे असल्यास एक चमचा दही अथवा मध घालू शकता. आंब्याचे साल मिक्सरमध्ये वाटून छान बारीक पेस्ट करून घ्या. आपला आंब्याचा फेसमास्क तयार आहे. ✽ **वापर:** सर्वप्रथम पाण्याने आपला चेहरा स्वच्छ धुवून घ्यावा. आता तयार केलेला आंब्याचा मास्क बोटांनी किंवा ब्रशच्या मदतीने डोळ्याखालील भाग सोडून, संपूर्ण चेहऱ्यावर लावून घ्या. हा मास्क चेहऱ्यावर साधारण १० ते १५ मिनिटांसाठी लावून ठेवा. नंतर कोमट



पाण्याच्या मदतीने चेहरा स्वच्छ करून घ्या. एखाद्या मऊ टॉवेलच्या मदतीने चेहऱ्यावरील पाणी टिपून घ्या. शेवटी चेहऱ्यावर तुमच्या आवडीचे मॉइश्चराइजर लावून घ्या. हा प्रयोग तुम्ही आठवड्यातून एक किंवा दोन वेळा करू शकता.

## आता टेंशन नाही, 'क्लिझो' आहे!

**कधीकधी आपण हजारो रुपये खर्च करून घेतलेले कपडे डाग पडला की जीवावर उदार होऊन लॉन्ड्रीमध्ये टाकतो. पण तो कपडा सुस्थितीत दिसेपर्यंत जीव टांगणीला लागतो. लोकांची अडचण ओळखून ठाण्यातल्या प्राची भोईर यांनी क्लिन्झो या नावाने चक्क लाईव्ह लॉन्ड्री काढली. जिथे तुमचा कपडा कसा, किती वेळात कुठली केमिकल्स वापरून धुतला जातो, हे तुम्ही अगदी समोर पाहू शकता.**

२० वर्ष कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये १७ बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम केल्यावर प्राची या व्यवसायात उतरल्या. मुळात फ्रेंच भाषा तज्ज्ञ असल्यामुळे विविध कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या डोमेनमध्ये त्यांनी काम केले. पुरेसा अनुभव मिळवल्यावर त्या आणि त्यांचे पती स्वत:चा पर्यावरणस्नेही व्यवसाय सुरू करण्याच्या विचारात होते. त्यासाठी केलेल्या रिसर्चमधून देशात ड्राय क्लिनिंगची ३०,००० कोटींची इंडस्ट्री अजूनही अनएक्सप्लोअर्ड आहे हे त्यांच्या लक्षात आलं. विशेषत: शहरांमध्ये लोकांकडे कपड्यांची निगा राखायला वेळ नसल्याने लॉन्ड्रीजना वाढती मागणी आहे. त्यामुळे याच क्षेत्रात काम करायचं त्यांनी ठरवले.

या क्षेत्रातल्या लोकांना भेटून आवश्यक ज्ञान घेतल्यावर वॉशिंग मशिनपेक्षा कमी पाण्यात ड्रायक्लीन करून आणि पर्यावरणस्नेही केमिकल वापरून आपण उत्कृष्ट सर्व्हिस देऊ शकतो, हे त्यांना कळाले. मग त्यांनी २६ जानेवारी २०२१ ला ठाण्यामध्ये पांचपाखडी भागात पहिले स्टोअर सुरू केले. या क्षेत्रातील शूज क्लिनिंग, सोफा क्लिनिंग, कारपेट, पडदे ,बेडशिटस, ब्लंकेट्स क्लिनिंग या पूरक गरजाही त्यांनी ग्राहकांच्या सेवेसाठी उपलब्ध केल्या. कपडे धुण्याच्या प्रक्रियेत अनेक केमिकल्स वापरले जातात. म्हणून पुढची दहा वर्ष उच्च गुणवत्तेचे काम देऊ शकतील अशी हायड्रोकार्बन तंत्र वापरलेली, इटालियन ब्रँडची, लेटेस्ट मशिन्स त्यांनी घेतली. त्यात वापरली जाणारी हायड्रोकार्बन केमिकल्स खूप महाग, पण आरोग्याच्या दृष्टिने सुरक्षित, पुनर्वापर करण्यायोग्य, जैविकदृष्ट्या विघटनशील आहेत. पाण्याच्या थेंबाचाही वापर न करता प्यूअर ड्रायक्लिनिंग यात होतं. ड्रायक्लिनिंगमध्ये प्रीमियम आणि इकनॉमिक सर्व्हिस असे दोन प्रकार आहेत. प्रिमियममध्ये

एक्झिक्युटिव्हजना लागणारे ब्लेझर्स, क्लब वेअर्स, पार्टी वेअर्स, महागडया साड्या, लाखांमध्ये किंमती असलेले वेडिंग लेहेंगे ड्रायक्लीन केले जातात. वेट क्लिनिंग म्हणजे पाण्याचा वापर करून कपडे धुण्यासाठी प्राची यांनी स्पॅनिश ब्रँडचं मशिन घेतलं. ३००० चौरस फुटाच्या नवीन जागेत ते बसवलं. इकॉनॉमी सेगमेंटमध्ये किलोंवर टॉवेल्स, शर्टस्, अंतर्वस्त्र धुवून दिले जातात. २०० रुपये किलो असा त्याचा दर आहे. त्यात नॉर्मल वॉशिंग, ड्राईंग, स्टीम प्रेस आणि बल्क पॅकिंग करून डिलिव्हरी दिली जाते. यासाठी किमान चार किलो लोड ग्राहकाला द्यावा लागतो. त्यामुळे हॉस्टेलवर किंवा पेइंग गेस्ट




म्हणून राहणारी मुले, नोकरीसाठी बाहेर राहणाऱ्यांची खूप सोय होते. 'क्लिझो'कडे कपडे आल्यावर त्यांच्याकडचे अनुभवी तज्ज्ञ वॉशर्स ते कसे धुवायचे याचा निर्णय घेतात. काही कपड्यांच्या लेबलवर धुण्यासंबधी सूचना लिहिलेल्या असतात, त्याप्रमाणे पुढची प्रक्रिया करावी लागते. तर इतर कपड्यांचा पोत आणि गुणधर्म लक्षात घेऊन ते कसे धुवायचे हे ठरवलं जातं. कपडे नुसते धुवून त्याच्या घड्या घालून देण्याची सेवा पण ते देतात. या सगळ्या कामांसाठी क्लिन्झोच्या तीन स्टोअर्समध्ये मिळून २० कर्मचारी कार्यरत आहेत.

अवघ्या तीन वर्षांत ७००० ग्राहकांचा बेस तयार झाला आहे, असे त्या सांगतात. व्यवसाय सेट करणं, वाढवणं हे खरं तर खूप सृजनशीलतेच काम आहे. कामाची शैली कशी असली पाहिजे, एस.ओ.पीज कशा सेट करायच्या हे कॉर्पोरेटमध्ये शिकलेलं ज्ञान इथे खूप उपयोगी येतं. स्वत:च्या कक्षा रुंदावण्याबरोबरच पुढच्या पिढीला देण्यासाठी एक संपन्न वारसा उद्योजक निर्माण करू शकतो, असे त्या सांगतात.

मानिनी



## रुचकर बनाना पॅनकेक

वाढदिवसाचं औचित्य असो वा नसो, मुलांना केक खायला कारण लागत नाही. अशा वेळी फ्रुट्स आणि केकचं कॉम्बिनेशन करून घरच्या घरी केक बनवला तर... मुलांची केक खायची इच्छा पूर्ण होईलच याशिवाय केळं खायला नाक मुरडणारी मुलं हा केक आवडीने खातील.

**साहित्य–** १२५ ग्रॅम मैदा, एक टी स्पून बेकिंग पावडर, दोन टी स्पून पिठीसाखर, १२५ ग्रॅम साखर, एक अंडं, एक टेबलस्पून तूप, एक मध्यम पिकलेलं केळं गोल काप करून, चवीपुरतं मीठ.

**कृती–** एका मोठ्या बाऊलमध्ये मैदा, बेकिंग पावडर, मीठ आणि पिठीसाखर एकत्र करून घ्या. दुसऱ्या एका बाऊलमध्ये हलक्या हाताने दुध, अंडं आणि तूप मिसळून घ्यावं. पहिल्या बाऊलमधील मैद्याचं मिश्रण दुधाच्या बाऊलमध्ये मिसळावं. हे मिश्रण ब्लेंडरने फेटून घ्यावं. त्यामुळे मिश्रण चांगल्या प्रकारे एकजीव होण्यास मदत होईल. त्यानंतर मिश्रण काही काळ तसंच राहू द्यावं. नॉनस्टीक तवा मध्यम आचेवर गरम करून घ्यावा. तवा तापला की त्यावर तूप पसरावं. त्यावर मैद्याचं मिश्रण एकसारखं गोल पसरावं. मिश्रणाच्या पृष्ठभागावरून वाफ निघेपर्यंत बेक करावं. आता त्यावर केळ्याचे काप ठेवून द्यावेत. काप ठेवलेली बाजू उलटावी आणि तव्यावर शेकून घ्यावी. हा पॅनकेक दोन्ही बाजूंनी सोनेरी रंगावर शेकून घ्यावा. पॅनकेक साधारणत: एक सेंटिमीटर जाडीचा असेल याची काळजी घ्यावी.

रुचिरा

## मधुबालाच्या फॅशनचा ट्रेंड आजही

जुन्या चित्रपटांमधली लोकप्रिय अभिनेत्री मधुबाला त्याकाळी फॅशनिस्टा म्हणून ओळखली जायची. तिच्या फोटोंवरून तिची स्टाईल आजही लोकप्रिय आहे हे दिसते. फुलांची साडी: मधुबालाने एका मासिकासाठी फोटोशूट केले होते. त्यातील तिची झलक खासच आहे. यात तिने फुलांची साडी नेसली होती. फुलांची डिझाइन असलेल्या साड्या आजही ट्रेंडमध्ये आहेत. ही अभिनेत्री १९५० च्या दशकात फुलांच्या साड्या नेसत होती. ओव्हर साईझ शर्ट आणि टाउझर: ओव्हर साईझ शर्टची फॅशनची सध्या चांगलीच ट्रेंडमध्ये असल्याचे दिसून येते. दीपिका पदुकोण, आलिया भट्ट आणि कियारा अडवाणी





अनेकदा या लूकमध्ये दिसल्या आहेत. पण मधुबालाने काही वर्षांपूर्वी असाच लूक स्वीकारला होता. पांढऱ्या साडीतील सौंदर्य: पांढऱ्या साडीचा ट्रेंड तुम्ही सध्या पाहत आहात. पूर्वीचे लोक पांढरी साडी नेसणे शुभ मानत नव्हते. पण तरीही मधुबालाने ही फॅशन अस्तित्त्वात आणली. वन शोल्डर गाउन: वन शोल्डर गाउन, मिडल पार्टिंग हेअरस्टाइल आणि कानात स्टड, मधुबालाची ही स्टाईल सगळ्यांपेक्षा वेगळी होती. मॅक्सी ड्रेस: मॅक्सी ड्रेस काही वर्षांपूर्वीच फॅशनमध्ये आला होता पण मधुबालाने हा ट्रेंड आधीच आणला होता. कंबरेला बेल्ट, मोकळे केस आणि कानातील झुमके ही स्टाईल नेहमीच आकर्षक ठरते. बेल्ट असलेली साडी: बेल्ट घालून साडी नेसण्याचा ट्रेंड काही आजचा नाही. त्याची सुरुवात अनेक वर्षांपूर्वी मधुबालाने केली होती.

## परफ्युम निवडताना...

व्यक्तिमत्त्वच नव्हे तर सभोवताल सुगंधित करण्याची किमया परफ्युममध्ये असते. दिवसभर दुर्गंधी आणि थकवा यांना मागे सारून टवटवीत ठेवण्यामागे सुगंध मोठी भूमिका बजावत असतो. त्यामुळे योग्य परफ्युम कसा निवडावा याविषयी...

✽ परफ्युम निवडताना व्यक्तिमत्व आणि त्वचेचा विचार करणं गरजेचं असतं. अनेकदा परफ्युम प्रत्यक्ष त्वचेवर लावल्यावर वेगळ्या प्रकारच्या सुगंधाचा अनुभव येण्याची शक्यता असते. त्यामुळे सुगंध त्वचेवर पारखूनच निवडा.

✽ परफ्युमवर इडीपी लेव्हल नमूद केलेली असते. परफ्युमची इडीपी पातळी जास्त असेल, तितक्या प्रमाणात सुगंध जास्त टिकतो. त्यामुळे ही पातळी पाहूनच परफ्युमची खरेदी करावी.

✽ परफ्युम निवडताना तो कधी वापर करायचा आहे हे ठरवून घ्या. रोजच्या वापरासाठी हलका किंवा फ्रुट फ्लेवर्ड सुगंध निवडावा. तर पार्टीसाठी थोडासा स्ट्राँग परफ्युम वापरावा.

✽ सुटेबल परफ्युम निवडण्यासाठी सर्वप्रथम एका स्ट्रीपवर लावून पहावा. ती स्ट्रीप त्वचेवर घासावी. हा सुगंध पाच मिनिटांपेक्षा अधिक काळ टिकून राहिला तर असा परफ्युम लाँग लास्टिंग असतो.

✽ परफ्युम निवडताना भारंभार सुगंध स्प्रे करून पाहू नका. यामुळे गोंधळ वाढू शकतो. सगळ्यात जास्त आवडलेले पाच परफ्युम निवडा आणि त्यातून हव्या त्या परफ्युमची निवड करा.

✽ अनेक सुगंध हुंगल्यानंतर



गोंधळ उडण्याची शक्यता असते. अशा वेळी कॉफी पावडर किंवा कॉफीच्या बिया हुंगाव्यात. यामुळे सुगंधांमध्ये फरक करताना गोंधळ उडण्याची शक्यता कमी होते.

✽ लव्हेंडर आणि सिट्रस परफ्युम्स थकवा दूर करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

ॲक्सेसरीज


## जपा हिरवी सोबत

घरातील वातावरण थंड आणि ताजं रहावं यासाठी छोटी छोटी रोपटी ठेवली जातात. अनेकदा गॅलरीतही लहान कुंड्या ठेवल्या जातात. योग्य निगा घेतली गेली नाही तर ही रोपटी मलूल पडतात. इनडोअर असलेल्या रोपट्यांना योग्य प्रमाणात पाणी देणंही गरजेचं आहे. याविषयी अधिक...

✽ इनडोअर प्लांट्सची पानं वारंवार सुकत असतील तर पुरेसं पाणी मिळत नसल्याची लक्षणं असू शकतात. त्यामुळे इनडोअर प्लांट्सना योग्य वेळी पाणी देणं गरजेचं आहे.

✽ रोपट्यांना पुरेसं पाणी मिळतंय की नाही हे सोप्या पद्धतीने तपासता येईल. यासाठी बोट कुंडीत हलकेच दाबा. माती मऊ, थोडी–फार मोकळी लागत असेल तर पुरेसं पाणी दिलं गेलं आहे हे समजतं. याउलट जास्त पाणी झालं असेल तर माती चिकट होते.

✽ इनडोअर प्लांट्सच्या पानांकडे लक्ष देणंही गरजेचं आहे. पानांची हळूहळू होणारी वाढ, बदलता रंग अशा बाबींची नोंद करणं गरजेचं आहे.



✽ इनडोअर प्लांट्ससाठी पावसाचं पाणी सर्वोत्तम असतं. अशा वेळी शक्य असल्यास पावसाचं पाणी साठवावं आणि रोपट्यांना द्यावं.

✽ वापरानंतर उरलेला चहाचा चोथा या रोपट्यांच्या कुंडीत टाकला जातो. असं करणं योग्य नाही. यामुळे मुंग्या आणि किड्यांना आयतंच आमंत्रण मिळतं.

✽ इनडोअर प्लांट्समधली माती सतत ओली राहाणार नाही याची काळजी घ्यावी. मातीत हवा खेळती राहील अशा प्रकारे पाणी देणं गरजेचं आहे.

✽ या रोपट्यांची वेळोवेळी छाटणी करणंही गरजेचं आहे.


✽ काही रोपटी आर्द्र वातावरणात चांगल्या प्रकारे वाढतात. खोलीतलं तापमान योग्य असेल याची खात्री करावी.

हिरवा शेजार

## चुका दाखवून दे

मी घटस्फोटित असून दोन वर्षांपूर्वी पुनर्विवाह केला आहे. बऱ्याच वेळा भेटीगाठी घेऊन, मुलीची कस्टडी माझ्याकडे आहे हे स्पष्ट सांगून, परस्परांची संपूर्ण संमती मिळाल्यानंतरच आम्ही एकमेकांची साथ पत्करली. सुरुवातीचे काही दिवस शांततेत गेले. पण आता तो माझ्या मुलीचा रागराग करतो. तिच्यासाठी पैसे खर्च करताना उपकार करत असल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर असतात. मी त्याच्या मुलांना मनापासून स्वीकारलं आहे. ही तीनही मुलं आपली असल्याच्या भावनेने मी सांभाळ करते. पती त्याच्या मुलांच्या मनातही माझ्या मुलीविषयी विष कालवत आहे. त्यांनी तिच्याबरोबर खेळलेलं त्याला आवडत नाही. अशा स्थितीत फार काळ गप्प राहणं मला जमणार नाही. संयमाचा बांध फुटताच भांडणं सुरू होतील. मी काय करु?

– सखी, दुधाने तोंड पोळलं की आपण ताकही फुंकून पितो. पहिला विवाह असफल ठरल्यामुळे तू हे नातं टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेस. पण ही बाब एकतर्फी असता कामा नये. त्याच्या आधाराने तुझं आयुष्य सुधारलं असलं तरी तुझ्या आधाराने त्याचंही मोडलेलं घर सावरलं आहे. तुझ्यामुळेच



त्याच्या मुलांच्या आयुष्यात रिकामी झालेली आईची जागा भरुन निघाली आहे. तेव्हा तू लाचार आहेस, हा विचार सर्वप्रथम काढून टाक. आता तुझी–माझी नव्हे तर आपली मुलं म्हणून तुम्ही त्या तिघांचं संगोपन करायला हवं. त्यात नवरा चुकत असेल तर त्याला समज देणं, मुलीच्या मनात तुम्हा दोघांप्रती चुकीची भावना उत्पन्न होणार नाही याची काळजी घेणं, तिला नव्या घराप्रती ओढ वाटेल याकडे लक्ष देणं ही तुम्हा दोघांची जबाबदारी आहे. त्यामुळे न घाबरता त्याला प्रश्न कर, चुका समोर मांड आणि स्वत:बरोबरच मुलीला न्यायाने वागणूक मिळेल याची काळजी घे.

समुपदेशन

## डोळ्यांचा मेकअप परफेक्ट करा



महिला अनेकदा घरच्या घरी आय मेकअप करतात. पण यात काही तरी चूक राहून जाते आणि चेहऱ्याचा नूर बिघडतो. हे टाळायचं तर परफेक्ट आय मेकअपच्या टिप्स जाणून घेऊ.

✽ डोळ्यांचा मेकअप काही काळानंतर पसरू लागतो. त्यामुळे संपूर्ण मेकअप खराब होण्याची शक्यता असते. हे घडू नये यासाठी आय प्रायमरची भूमिका महत्त्वाची असते. त्वचेशी मिळतजुळतं आयप्रायमर लावावं. त्यामुळे आयशॅडोलाही उठाव मिळतो.

✽ अनेकींचे आयलॅशेस तेलकट असतात. अशा वेळी मस्कारा जास्त काळ टिकत नाही. हे टाळायचं तर बीबी आणि सीसी क्रीम कन्सिलरसोबत मिसळून आयबेस क्रीम बनवावं. हे क्रीम पापण्यांवर लावावं आणि लूज पावडरने सेट करावं. यामुळे पापण्या तेलकट होत नाहीत.

✽ डोळ्यांखाली काळी वर्तुळं असतील तर च कन्सिलरचा वापर करावा, हा गैरसमज आहे. घरच्या घरी आय मेक अप करत असाल तर कन्सिलरचा आवर्जून वापर करावा.

✽ आयशॅडो लावताना चांगल्या प्रकारे ब्लेंड करणं गरजेचं आहे. त्यामुळे सेट होताना फिस्कटत नाही. याशिवाय पहिल्यांदा आयशॅडो वापरणार असाल तर पावडर आयशॅडोची निवड करावी.

✽ आय मेकअपसाठी फ्लॅट ॲप्लिकेटर ब्रश सर्वात योग्य आहे. आयब्रो बोनला उभारी देण्यासाठी फ्लॅट अँगल ब्रश वापरावा.

✽ आयलायनर हा डोळ्यांच्या मेकअपमधील महत्त्वाचा भाग आहे. प्राथमिक स्तरावर पेन्सिल आयलायनरचा वापर करावा. लायनर लावण्यात हात बसल्यावर जेल किंवा लिक्विड लायनरचा वापर करावा.

मेकअप मंत्रा


### स्मार्ट मंत्रा

#### फॉईलचा असाही उपयोग

अन्न अधिक वेळ गरम राहण्यासाठी ॲल्युमिनिअम फॉईलचा वापर केला जातो. या फॉईलचे इतरही अनेक उपयोग आहेत. ग्रीलवरील धुळ आणि जळमटं स्वच्छ करण्यासाठी पेपर फॉईलचा उपयोग केला जातो. पिझ्झा पुन्हा गरम करायचा असेल तर फॉईलमध्ये ठेवून गरम करावा. काळवंडलेली भांडी स्वच्छ करण्यासाठी देखील फॉईलचा उपयोग करणं शक्य आहे.

### टेक केअर

#### कान जपा



कान स्वच्छ ठेवण्यासाठी इअरबडस्चा वापर केला जातो. याशिवाय अनेकदा पिन्स, पेन किंवा इतर वस्तूही कान स्वच्छ करण्यासाठी वापरल्या जातात. यामुळे कानाला अपाय होण्याची शक्यता असते. कान हा नैसर्गिकरित्या स्वच्छ होणारा भाग आहे हे लक्षात घ्यायला हवं. त्याला स्वच्छ करण्यासाठी बाह्य साधनांची गरज नसते. त्यामुळे बडस् किंवा इतर वस्तू कानात घालू नयेत. याशिवाय आंघोळ करतानाही कान पाण्याने धुवू नये.

### ट्रेंड मॅनिया

#### स्ट्रेटनिंगसाठी...

आजकाल सिल्की केसांचा ट्रेंड सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे केस स्ट्रेट करण्याचं प्रमाण वाढलं आहे. आजकाल स्ट्रेटनिंगसाठी क्रीमची मदत घेतली जाते. केसांचा पोत कसा आहे यावरून स्ट्रेटनिंग क्रीमची निवड करावी. नॉर्मल केसांसाठी माईल्ड स्ट्रेटनिंग क्रीम वापरावं. फ्रिंजी केसांसाठी रेजिस्टंट स्ट्रेटनिंग क्रीम वापरावं.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✽ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11